१. सेवनी सांधा (suture joint) - अर्थात एक हाड दुसऱ्या हाडाच्या टोकदार कडांना मिळणे जसे - पार्श्वकस्थि (Parietal bone.) मध्ये आढळली जाते. ज्याद्वारे मुर्धा भाग बनतो.
२. उपास्थि किंवा कोमलस्थि द्वारे सांधा - स्थानाचे गठन
३. बंधन (ligaments) द्वारे

समस्त सांधे एका प्रकारच्या पुष्कळ कडा तसेच चमकदार पदार्थ यांनी घेरलेले असतात ज्यांना सूत्रहीन उपस्थि' (articular capsule) म्हंटले जाते. त्यांच्याद्वारे हाडे आपल्या स्थानावर व्यवस्थित टिकून राहतात तसेच ती सरकू शकत नाही.

हाडांच्या उक्त स्थानावर जिथे ते एकमेकांशी जुळतात, कोमल अस्थि सारख्या पदार्थाचे आवरण चढलेले असते, त्यांना संधि समूहाची उपस्थि' (articular cartilage) म्हंटले जाते.

सगळी हाडे तंतुमय, शिरा समन्वित पडद्यांनी झाकलेली असतात ज्याला अस्थि आवरण (Periosteum)

असे म्हंटले जाते. याच ठिकाणच्या शरीराच्या पोषण करणाऱ्या धमण्या ज्यांना रक्त वाहिन्या म्हंटले जाते, त्या लहान-लहान अस्थि छिद्रांमध्ये (foramina) प्रवेश करतात. हे अस्थि किंवा आवरण जोपर्यंत स्वस्थ तसेच क्रियाशील असते तोपर्यंत हाडांचे दोष-तुटणे सरकने इत्यादीला सुधारता येते अन्यथा नाही.

अस्थिंची निर्मिती सजीव पदार्थ (organic matter) तसेच खनिज पदार्थ (mineral matter) यांच्या एकत्रीकरणातुन होते. यामध्ये सजीव पदार्थाचे प्रमाण ३३.३०% तसेच खनिज पदार्थाचे ६६.७०% आढळून येते.

लहान मुलांच्या हाडांमध्ये सजीव पदार्थाचे प्रमाण अधिक असते. यामुळेच त्यांची हाडे लवचिक असतात तसेच जखम झाल्यावरती तुटण्या ऐवजी वाकली जातात परंतु वृद्ध लोकांच्या हाडांमध्ये खनिज पदार्थांची मात्रा वाढलेली असते त्यामुळे आघात झाल्यावर ती तुटतात.

२.६ अस्थि तंत्राचे प्रकार :

अस्थि पंजरला दोन भागांमध्ये विभागले जाते -

१. अक्षय कंकाल (axial skeleton) - या अंतर्गत मणक्याचे हाड, डोक्याचे हाड, छातीचा पिंजरा, स्टर्नम यांची हाडे येतात.

२. अनुबंधीय कंकाल (appendicular skeleton) - या अंतर्गत शाखा आणि चक्रे (limbs girdles) यांची हाडे येतात परंतु अधिक सुविधेसाठी आपण कंकालला तीन भागात विभाजित करतो -

अ) खोपडी अथवा कपाळ (skull)

ब) धड (trunk)

क) हात आणि पाय (upper lower limbs)

२.७ अस्थि तंत्रामध्ये हाडांची संख्या :

मनुष्य शरीरा मध्ये आढळून येणाऱ्या २०६ हाडांमधील विभिन्न अंगामद्धे खालील संख्येने हाडे आढळली जातात-

- कपाळ (cranium)	-	८
- चेहरा (face)	-	१४
- कान (ear)	-	६
- मणका (spinal column)	-	२६
- छातीचा पिंजरा (ribs)	-	२४ (१२+१२)
- छाती (sternum)	-	१
- हाइओइड बोन .... (hyoid bone)	-	१
- ऊर्ध्व शाखा (hands)	-	६४ (३२+३२)
- निम्न शाखा (legs)	-	६२ (३१+३१)
Total	-	२०६

पुरुष शरीरा प्रमाणे स्त्रियांच्या शरीरामध्ये सुद्धा एकूण २०६ हाडे असतात. उक्त हाडांच्या संख्येसंबंधी विशेष विवरण खलील प्रमाणे -

✻ खोपडीच्या अस्थिमध्ये -

अ) १. मस्तीष्क (cranium) - ८

२. चेहरा (face) - १४


✻ धडाच्या अस्थिंमद्धे -

३. दोन्ही ठिकाणच्या छाती च्या पिंजऱ्या मध्ये (१२+१२) - २४


	४. छाती (sternum)	–	१
	५. कॅल्व्हिकल आणि मानेची हाडे (clavicle collar bones)	-	२
ब)	६. खांद्यांची हाडे (shoulder blades scapula)	–	२
	७. श्रोणि मेखला (hip girdle)	–	२
	८. मणके (vertebrae)	–	३३
❊	**हाताच्या अस्थींमध्ये –**		
क)	९. प्रगंडा हाडे (humorous)	–	२
	१०. आतील प्रकोष्ठ हाडे (ulna)	–	२
	११. बाहेरील प्रकोष्ठ हाडे (radius)	–	२
	१२. मनगटाची हाडे (carpel bones)	–	१६
	१३. शलाका हाडे (meta carpels)	–	१०
	१४. बोटांची हाडे (phalanges)	–	२८
❊	**पायांची हाडे**		
	१५. ऊर्ध्व–विकस्थि – फीमर (femur)	–	२
	१६. जानु अस्थि (knee cap)	–	२
	१७. अंतर जंघी (tibia)	–	२
	१८. बहिर जंघी (fibula)	–	२
	१९. गल्फ अस्थि (tarsals)	–	१४
	२०. अनूगुलफास्थि (meta tarsals)	–	१०
	२१. अंगुला अस्थि (phalanges)	–	२८
	एकूण	**–**	**२०६**

हाडांचे प्रकार :

1. COMP-CT BONE



2. SPONGY BONE




हाडांचे वर्गीकरण:


संरचनेनुसार–


1. Compact = solid mass, dense and hard
   = forms the outer layer of bone structure
   = functional unit Haversian system

2. Cancellous or spongy = contain spaces filled with bone marrow
   = incomplete Haversian system.



Classification of Bones





*** According to Shape**

1.	Long bones	=	length is greater than breadth
		=	consists of shaft (diaphysis) & two extremities (epiphysis)
	Diaphysis	=	filled with yellow marrow
		=	cylindrical, large space or canal at the center
		=	periosteum
	Epiphysis	=	made up of cancellous tissue e.g., femur, humerus, tibia, fibula, radius, ulna, phalanges
	Membranes :		1. Periosteum
			2. Endosteum

2. Short bones = cuboidal in shape
= spongy bone with thin coat of compact bone
= sesamoid bone - short bone embedded in a tendon e.g. patella e.g. carpals (wrist), tarsal (ankle) bones

3. Flat bones = broad or elongated flat plates
= for protection & muscle attachments


composition : 2 thin layers of compact disc, enclosing at thin layer of spongy bone e.g. bones of the skull, sternum, ribs, scapula


4. Irregular bones = all other bones not assigned to the previous groups
e.g. : vertebrae, pelvic bones, bones of the base of the skull

*** According to development**

1. Membranous = staris as fibrous membrane, calcium gradually deposited until structure becomes ossified - intramembranous ossification
e.g. : bones of the skull, mandible

2. Cartilagenous = starts as cartilage, gradually osstiled enchondral or intracartilagenous ossification, e.g. : long bones.





डोक्याची हाडे (SKULL) :

डोक्यांची हाडे म्हणजे डोक्याचा वरचा भाग बनविणारी हाडे होय. डोके कींवा कपाळ यांची विभिन्न हाडे एकमेकांमध्ये अशी दृढतेने अडकलेली आहेत की ती सगळी मिळून एका हाडाचे रूप घेऊन बसलेली आहेत आणि त्या कारणामुळे ती अजिबात हालचाल करू शकत नाही. डोक्यांच्या हाडांची संख्या - ८ आहे.

१. पूर्व कपालास्थि– (Frontal bone) – हे कवटीच्या समोरच्या बाजूला असणारे हाड आहे. याची संख्या -१ आहे.

२. पश्च कपालास्थि– (Occipital Bone) – यापासून डोक्याचा मागचा भाग तयार होतो. याची संख्या -१ आहे.

३. पार्श्व कपालास्थि– (Parietal Bone) – हि डोक्याच्या दोन्ही बाजूला असतात. तसेच हे मिळूनच मूर्ध्दादेश किंवा मस्तिष्काचा शिरोभाग तयार होतो. यांची संख्या - २ असते.

४. शंखास्थि– (Temporal Bone) – डोक्याच्या दोन्ही बाजूने असतात. यामध्येच छोटी अस्थि (ossifies) तसेच कानाचा मध्यभाग (middle ear) हे सुद्धा संख्येने -२ असतात.


५. कीलकास्थि किंवा जतूकास्थि– (Sphenoid bone) – हे दोन्ही शंखास्थिंच्या मध्ये असते. यामुळे डोक्याची निर्मिती होते.

६. **शौनिरास्थि किंवा झर्झरास्थि– (Ethamoid Bone) –** हे नाकाच्यावर तसेच डोळ्याच्यामागे असते याच्या आतून येणारे सगळे स्नायू डोळ्यात जातात. हे स्नायू लहानपणी संयुक्त असतात. परंतू सात–आठ वर्षांपर्यंत एकत्र येऊन दृढ होतात.

डोक्याच्या उक्त ८ हाडांच्या विषयासंबंधी विस्तृत विवरण खालीलप्रमाणे–

१. **पूर्व कपालास्थि (Frontal bone) –** याला ‘संमुख कपालास्थि’ किंवा ‘ललाटास्थि’ असे म्हणतात. हे डोक्याच्या संपूर्ण हाडांमध्ये अग्रभागी स्थित असते. याचे २ भाग होतात वरील गोल भागाला ‘पट्टक’ (squamous) तर खालील भागाला ‘पिंड’ असे म्हणतात. हे हाड डोक्याला वरून आच्छादिते कारण कपाळाची निर्मिती होते. या हाडामध्ये पट्टकाचे २ भाग होतात. १. अग्र, २. पश्च

अग्रतल उन्नोदर तसेच चिकट असतो. आणि त्याच्या वरती दोन्ही बाजूला हाडे काही प्रमाणात वरती आलेली दिसतात. यावर एक चपटी मांसपेशी असते. ज्याला ‘ललाटिका’ (frontalis muscle) म्हंटले जाते. हि मांसपेशी क्रोध किंवा त्योरी बदलाच्या वेळी आकुंचन पावते तसेच शांत अवस्थेत प्रसरण पावते, याचा मागील भाग हा टोकदार (serrated) असतो. जो पार्श्व कपालास्थिच्या अग्रस्थळाशी जोडलेला असतो. या ललाटिस्थिच्या खालील भागामध्ये दोन चाप असतात ज्यांना ‘अधिनेत्रगुहा चाप’ (supra orbital arches) म्हंटले जाते. या दोन्ही चापांच्या मध्यभागी नाकाचे हाड (nasal bone) लागून असते ज्याला ‘झर्झरास्थि प्रवर्ध’ (ethmoid process) असे म्हणतात. पट्टकाचा पश्चतलअंतर्गोललेपलरींश असतो ज्याच्या आत अधिकाच्या खुणा असतात. प्रमस्तिष्काचा अग्रखंड याच्या बरोबर खाली असतो. पट्टकाचा पिंड डोळ्याच्या पोकळीची निर्मिती करते.



२. **पश्च कपालास्थि – (Occipital bone) –** हे हाड डोक्याच्या अगदी मागील भागात स्थित असते. याचे देखील १. पट्टक आणि २. पिंड असे दोन भाग पडतात. या दोघांच्या मध्ये एक अगदी मोठे गोल छिद्र असते, ‘महाछिद्र’

किंवा ‘महाविवर’ (foramen magnum of occipital bone) असे म्हंटले जाते.

या हाडाचे पट्ट्क सगळ्यात मागील भागात स्थित असते, याचे दोन भाग असेच तीन धारा असतात. याचे पश्चतल उभारलेला दिसतो. याच्या मध्ये एका छोट्या गोल हाडाचाउभट असतो. ज्याला ‘कपाळ गुळिका’ (occipital tubercle) असे म्हंटले जाते. त्या गुळीकेपासून एक मोठा तसेच दृढ तंतूचा प्रारंभ होतो. जो मणक्याच्या हाडच्या वर असलेल्या शृंखले मध्ये सलंग्न असतो. याच्या दोन्ही बाजूला तीन उभारून आलेली रेषा बनलेली असते ज्यांना क्रमश: १. अधिरेखा (superior nuchal line) २. मध्य रेषा (middle nuchal line) तसेच ३. अध्य: मध्य रेषा (inferior nuchal line) म्हंटले जाते. या रेषेच्या उभरल्याने अनेक मांसपेशी आरंभीत होतात. जे मान, मणका, तसेच पाठ ल जोडलेली असते.

याचा अग्रभाग हा टोकदार असतो. जो पार्श्व कपालीस्थी च्या पुढील भागाशी संयुक्त असतो. (posterior border) ला संयुक्त असतात. याचा पार्श्व भाग शंखस्थी च्या (temporal bone) चे कर्णमुल प्रवर्ध (mastoid process) च्या मागील कडाला जोडलेला असतो. पत्तकाचा अग्रतल हा लेपलरींश तसेच आतील बाजूस असतो. याला दोन उभी असणारी हाडे जे आडवी होऊन एकदुसर्या्ला कापतात, व ४ भागात विभक्त करतात. वरच्या २ भगत पश्च खंड (occipital lobe) चे शेवटचे भाग तसेच खालच्या भागात ‘लघु मस्तिष्क’ ची अवस्थिती असते.

या हाडाचा ‘पट्ट्क पर्वोक्त महाछिद्र’ च्या अग्रभागामद्धे स्थित तसेच चौकोर असते. याला पश्च कपालस्थि चा आधारी भाग (basilar portion of the occipital bone) म्हणतात. याच्या समोरील भाग जंतुकास्थि (sphenoid bone) च्या मागील कडाला मिळतो तसेच पार्श्व भाग शंखास्थि (temporal bone) च्या पिट्रस भागा च्या दोन्ही बाजूस मिळतो. महाछिद्र , ज्यामधे ‘सुषुम्ना शीर्ष’ (medulla oblongata) निघतो, याच्या दोन्ही बाजूसे हाडांचे दोन मोठे ऊभार दिसून येतात.

३. पार्श्व कपालास्थि (Parietal bone) – ही हाडे संखेने २ असतात तसेच पूर्व कपालस्थी आणि पश्च कपालस्थी च्या मध्ये राहतात. ही आकाराने गोल असतात. याचे २ धरातल आणि ४ किनारे असतात.

यांचा वरील धरातल (superior surface) गुळगुळीत तसेच उभारलेला असतो. ही दोन्ही हाडे एक दुसऱ्या ना मिळून एका गुंबद सारखी बनवते. जो प्रमस्तिष्क च्या पार्श्व भागाला चांगल्या प्रकारे आछादुन टाकते.

पार्श्व खंडाचा खालील धरातल हा टोकदार आणि खुरखुरा असतो. हा मस्तिष्कच्या संपर्का मध्ये राहतो तसेच त्याच्या आतमध्ये छोटी धमान्यांचे चिन्ह दिसून येतात. पार्श्व कपालास्थीचा आधीमध्य भाग परस्पर एकमेकांशी मिळेलेले असतात.

ही दोन्ही शैशवावस्था मध्ये मुलायम असते पाच – सहा महिन्या पर्यंत जवळ जोडलेली नसते, त्यानंतर जोडलेली जाऊन कठोर बनते.

४. शंखास्थि (Temporal bone) –

ही हाडे डोक्याच्या दोन्ही बाजूला पुढील भागात स्थित असतात याच्यावर पार्श्व कपालस्थी, समोर ललाटास्थि, मागे पश्च कपालस्थी तसेच, खाली जबड्याच्या वरील भागाची स्थिति राहते यामध्ये दोन छिद्रे असतात. १. कानाचे छिद्र २. खालील बाजूचे छिद्र ज्याला carotid canal असे म्हणतात आणि ज्याच्या द्वारे (internal carotid artery) मस्तिष्कच्या आत मध्ये प्रवेश करते.

या हाडाचे ५ भाग होतात –

१. पट्ट्क – (Squama) – हा लांबट भाग खोपडीच्या पार्श्व भागामध्ये स्थित असतो याचा वरील भाग पातळ तसेच गोल आणि पार्श्वभाग कपालस्थि च्या पार्श्व धारेशी संयुक्त असतो. याचा अग्रभाग ललाटास्थीशी जोडलेला असतो. याचे आधीमध्य तसेच पार्श्व ही दोन तल असतात.

२. कर्णमुल प्रवर्ध (Mastoid process) – हा कानपट्टीचा मागील भाग आहे जो पश्चकपालास्थिच्या पट्टकाच्या अग्रभागी जोडलेला असतो. हा कानाच्या छिद्राच्या मागील बाजूस असतो.

३. पिट्रस भाग (Petrousportion of the temporal bone) – हा डोक्या मध्ये असलेला कानपट्टीचा भाग आहे. ज्याच्या मागे कपालस्थी तसेच, अग्रभागामध्ये जतुकास्थि (sphenoid bone) स्थित असतो. यामुळे श्रवण अंग स्थिर बनते.

४. शर प्रवर्ध – (Styloid process) – सळईच्या आकाराचा हा अत्यंत पातळ भाग खालील बाजूस स्थित असतो, याने हाडाचे दोन स्नायू – कंठीकाशर स्नायू' (staylo-lyoid ligament) तसेच, अधोहन स्नायू' (stylo-mandibular ligament) आरंभ होतात. पहिलं स्नायू शरप्रवर्धापासून सुरवात होऊन कंठकास्थि ला जाऊन मिळतो तसेच दुसऱ्या जबड्याला जाऊन मिळतो.

५. गंड प्रवर्ध (Zygomatic process) – हे एक पातळ लांब हाड कानाच्या छिद्राच्या एका पातळ पडद्याने झाकलेले असते त्यास 'शंखप्रावर्णी' म्हंटले जाते. यामुळे यामधून 'शंखछादिका' (temporalis muscles) नामक एक मांसपेशी बाहेर येते. पट्टकाचा मध्यतल नतोदर अथवा खुरखुरा असतो तसेच मस्तीष्काच्या भागाशी संबंधित असतो. ज्याला शंखियखंड (temporal lobe) म्हंटले जाते.

४. किलकास्थि किंवा जतुकास्थि (Sphenoid bone) – हे पसरट हाड मस्तीष्काच्या आधारावर, दोन्ही शंखस्थिच्या मध्ये शाखा पसरून वटवाघळा प्रमाणे राहतात. याचे पिंड (बॉडी) तसेच वक्षक (ala) नावाचे दोन भाग असतात. पिंड' नावाचा भाग पातळ, छोटा तसेच चौकणी असतो. हा दोन्ही वक्षकांच्या मधी असतो. तसेच याचा भाग पश्चकपालास्थी च्या आधारी भागाशी जोडलेला असतो. याच्या वरील भागमध्ये पीयूष ग्रंथी (hypophysis cerebri) तसेच पिनियलबॉडी (pineal body) वसलेली असते.

वक्षक' नामक पसरलेल्या भागावर बृहद मस्तीष्कचा आधार असतो. ह्याचा अग्रभाग ललाटास्थि पिंडच्या पृष्ठा भागाला जोडलेला असतो तसेच पृष्ठभाग शंखास्थिच्या पिट्रस भागाच्या अग्रभागाशी संयुक्त असतो .

५. शैविरास्थि अथवा झर्झरास्थि (Ethmoid Bone) – हे हाड नाकावर तसेच डोळ्याच्या मागे असते.

६. चेहर्याचे हाड (Bones of Face) – संपूर्ण मुखमंडल अर्थात, चेहरा १४ हाडांनी बनलेला आहे. ह्याची नावे खलीलप्रमाणे आहेत –

ऊर्ध्व हनु अस्थि (superior maxillary bone)	– २
अधो हनु अस्थि (inferior maxillary)	– १
कपोलस्थि (malaror cheek bones)	– २
टाळू अस्थि (palate bone)	– २
नासास्थी (nasal bones)	– २
अध: शुक्तिकास्थि (inferior turbinated bones)	– २
नासाफलकस्थि (vomers bone)	– १
अश्रु अस्थि (lachrymal bones)	– २

यामधील केवळ अधो हनु अस्थि चे अतिरिक्त १२ हाडे आचल आहे आणि ते कपाळाला जोडलेली असतात.

या हाडांच्या विषयीची विशेष माहिती खालीलप्रमाणे समजून घेतली पाहिजे –

१. ऊर्ध्व हनु अस्थि (superior maxillary bone) –

ही हाडे संखेने २ असतात, हे एकमेकांना जोडलेली असतात. यांचे गाल बनविण्यास सहाय्य मिळते. यांचे ३ मुख्य भाग असतात.

a) Palatine part – यामध्ये परस्परात जोडलेली २ पातळ हाडे असतात. ज्यांच्याद्वारे मुखचा वरील भाग तसेच वरील नाकाचा आधार तयार होतो.

b) Alveolar part – हा गोलाकार भाग तोंडाच्या वरील भागाला बनवितो. यालाच जबडा असे म्हणतात. याच्या

एका घेरमध्ये १६ छिद्रे असतात. याच्या वरती ओठ देखील लागलेला असतो.

c) Orbital part – हा दोन्ही डोळ्यांच्या गोलचा धरतल भाग आहे.

२. अधो हनु अस्थि – (inferior maxillary bone) – हे संखेने १ असते याला खालच्या जबड्याचे हाड असे म्हणतात. ही बुटाच्या टाचे सारख्या आकाराची असते. यामुळे हनुवटी बनते. याच्या पसरट भागाला 'हनुकूट' (ramus of mandible) म्हणतात. याचे २ आधारतल असतात. बाहेरील आधारतळा (convex) मध्ये ओठांना गती प्रदान करणारी पेशी तसेच त्यातील आतला भाग (concave) मध्ये जिभेला गतिशील ठेवणारी पेशी असतात.

याचा खलील भाग खुप पातळ असतो आणि त्यामधून जास्त पातळ मांसपेशी गळ्याच्या दिशेने खालून जाते ज्याला platysma म्हंटले जाते.

अधोहनुस्थि चा पसरट भाग जो गाला चा भाग उभारतो त्याला प्रशाखा (ramas) असे म्हंटले जाते. याच्या मागील कोपऱ्याला ज्याच्या वरती गोल बनलेला आहे त्याला mandibular condyle म्हंटले जाते. हा भाग शंखस्थी च्या अधो हनु अस्थिला जोडलेला राहतो. याच्या समोरचा टोकदार भाग गंड प्रवर्ध च्या अभिमध्य च्या ठिकाणी स्थित असतो. याचा पार्श्वतल चतुष्कोनात्मक असतो ज्याच्या वरती चर्वनिका (जीभ) जोडलेली असते.

३. कपोलस्थि अथवा गंडास्थी (malaror cheek bones) – हे हाडे संखेने दोन असतात ही चेहऱ्याच्या बाहेर तसेच वरील भागावर असते. याच्याद्वारे गालाचा वरचा उंचवटा बनतो. ही हाडे आयतकृती असतात. तसेच गालाच्या दोन्ही बाजूस स्थित असते. याचे ४ भाग असतात. याचा एक वरील भाग डोळ्यांचा आधार (eye orbit) बनतो. तसेच नासास्थीला जोडल्या जातो. पार्श्व भाग शंखास्थी च्या गंड प्रवर्ध ने बनलेला असतो. खालचा भाग ऊर्ध्व हनु अस्थि ला जोडलेला असतो तसेच बाहेरील धरातल त्वचेने झाकलेला असतो.

४. टाळू अस्थि (palate bone) – ही हाडे देखील संखेने दोन असतात ही एक एक संखेने नाकाच्या मागे दोन्ही बाजूने असते, याच्या द्वारे टाळू ची निर्मिती होते टाळूचे दोन अंश असतात. १. कठीण तसेच २. कोमल . कठीण भाग हा दाताचा पृष्ठ भाग असतो तसेच त्याचा मागील कडा कोमल भागाशी जुळलेल्या असतात.

५. नासास्थी (nasal bones) – हे हाडे देखील संखेने २ असतात. तसेच नाकाच्या मधल्या भिंतीच्या मागील भागाची निर्मिती करतात ही दोन्ही एकमेकांच्या सन्मुख जोडलेली असतात. याच्या मधून एक हाड निघते, जे नाकाला उजवे- डावे या दोन भागात विभागते.

नासास्थिचा वरचा भाग ललाटस्थि च्या खालच्या किंवा मधल्या भागाला जोडलेला असतो. याच्या आधीमध्य तल च्या वरती सर्वात पातळ पडदा असतो. जो आतल्या भागात राहतो. इथूनच घ्रानतंत्रिका ललाटास्थि च्या खालील छिद्राला पार करत वरती मस्तीष्कामध्ये जातात.

या हाडाचे पार्श्व तल डोळ्याच्या पोकळीतील अभिमध्य सीमा बनवून ऊर्ध्व हनु अस्थि ला जोडते. याचा खालील भाग नासा उपस्थि नावाच्या नरह हाडाशी संयुक्त राहतो.

६. अध: शुक्तिकास्थि – हे हाडे देखील दोन असतात. तसेच एक- एक करून दोन्ही नाकाच्या पोकळीत राहतात.

७. नासाफलकस्थि (vomers bone) – हे हाड केवळ एक असते तसेच नाकाच्या मधील भिंतीच्या मागील भाग बनविते.

८. अश्रु अस्थि (lachrymal bones) – ही हाडे संख्येने दोन असतात, तसेच डोळ्यांच्या खोलीच्या समोरील भागामध्ये स्थित असतात. यांच्या मार्गापासून अश्रु निघून नाकामध्ये येतात.

चक्षू गहर (eyes) – डोळ्यांच्या दोन्ही बाजूला एक- एक गोल खड्डे असतात त्यांना चक्षू गहर म्हंटले जाते. यामध्येच चक्षू गोलक राहतो. हा चक्षू गोलक खालील ७ हाडांनी बनलेला असतो.

i. ललाटास्थि (frontal bone)
ii. झर्झरास्थि (ethmoid bone)

iii. जतूकास्थि (sphenoid bone)

iv. अश्रू अस्थि (lachrymal bone)

v. ऊर्ध्व हनु अस्थि (superior maxillary bone)

vi. टाळू अस्थि (palate bones)

vii. गन्डास्थि (molar bones)

ब्रम्हरंध्र किंवा अधिपति रंध्र (fontanelles and posterior) –

ब्रम्हरंध्र (fontanelles) – दोन्ही पार्श्व कपालास्थी तसेच ललाटास्थि जिथे पश्च मस्तकास्थि मिळते, तिथे एक त्रिकोणी खड्डा असतो, हा खड्डा एक वर्षापेक्षा कमी वर्ष असलेल्या मुलांच्या डोक्यामध्ये दिसून येते यालाच ब्रम्हरंध्र म्हणतात. याच स्थानावर पूर्ण कपालस्थी पासून दोन पार्श्व कपालास्थि मिळते.

अधिपतिरंध्र (posterior fortanelle) – सम चतुर्भुज अर्थात चतुष्कोण खड्डा असतो, जो सहा महिन्याच्या कमी वर्षाच्या शिशुंच्या डोळ्यात दिसून येतो, हा खड्डा पश्च कपालस्थि तथा पार्श्व कपालस्थी चे सम्मिलन स्थान वर होतो.

स्मरणीय आहे की लहान मुले जस जशी मोठी होतात त्यात्या प्रमाणे हे दोन खड्डे भरत राहतात . जर खलील हनु मध्ये कोणत्या प्रकारचा झटका अथवा आघात लागला तर तो आघात मस्तिष्क पर्यंत जाऊन पोहचतो जर हा आघात अथवा झटका जोरात असेल तर त्यामुळे खोपडीच तल तुटू शकतो. खोपडीमध्ये मस्तिष्क सुरक्षित असतो छोट्या मुलांना या प्रकारच्या झटका अथवा आघातपासून वाचवणे महत्वाचे असते.

मेरूदंडाची हाडे (spinal vertebral column)

मेरुदंडामध्ये एकूण ३३ हाडे असतात, हि हाडे आपापसात एक शृंखला जोडलेली आहेत आणि त्यांना कशेरुका (vertebra) म्हंटले जाते, हि पाठीच्या बरोबर मध्ये स्थित आहेत. मेरुदंड पश्च कपालास्थि (occipital bone) च्या खालील भागापासून आरंभ होऊन खाली गुदद्वार च्या जवळ समाप्त होते. मान, पाठ तसेच कंबरेच्या खाली हुंडे प्रमाणे निर्मित या कडी ला मेरुदंड, रीड अथवा कशेरुका नावाने ओळखले जाते.

मेरुदंडाच्या एकूण ३३ vertebras खालील प्रमाणे विभाजित केले जाते.

१. ग्रीव कशेरुका (cervical vertebra) – यामध्ये एकूण ७ vertebra असतात हे माने मध्ये असतात.

२. वक्षीय अथवा पृष्ठ कशेरुका (thoracic / dorsal vertebra) – यामध्ये एकूण १२ vertebra असतात हे पाठीच्या मध्यभागी राहतात.

३. कटी कशेरुक (lumber vertebra) – यामध्ये एकूण ५ vertebra असतात हे कटी प्रदेशामध्ये स्थित असतात.

४. त्रिकंकशेरूक अस्थि त्रिकास्थि (sacral vertebra or sacrum bones) – हे तीन स्थानावर राहतात, परंतु संख्येने हे एकमेकांशी अशाप्रकारे जोडलेले असतात जसे कि ते एकच हाड आहे, या कारणानेच त्यांना त्रिकास्थि म्हंटले जाते.

५. अनुत्रिक कशेरूका (coccygeal vertebra) अथवा गुदास्थि (tail bone) – हे संख्येने ४ असतात परंतु, हे देखील एकमेकांशी मिळून एकाकार झालेली असतात याच्या मुळेच यांना गुदास्थि देखील म्हणतात.

वरील प्रमाणे मानेमध्ये ७, पाठीमधे १२, कंबरे मध्ये ५, त्रिकास्थि ५, अनुत्रिक ४ अशा प्रकारे ३३ मणके असतात, परंतु त्रिक मणके तसेच अनुत्रिक मणके एकमेकांना जोडल्यामुळे हे एकसारखेच प्रतीत होतात . नाही तर या हाडांची संख्या अथवा मणक्यांची संख्या हि एकूण २६ च असते.

मेरुदंडाच्या मणक्यांची हाडे आकाराने एक दुसऱ्याशी काही भिन्न, वेडी- वाकडी, वरती- खाली तसेच लहान मोठी असतात. यांच्या मध्ये एक छिद्र (vertebral foramen) असते. त्याचबरोबर त्यांना एक शेपटी सारखा भाग हि दिसून येतो याचे मोठे तसेच पातळ दोन अंश असतात, मोठ्या अंशाला पिंड असे म्हणतात . हाच घेरलेला असतो, ज्याचा मागील भागाला कशेरुका कंटक (spinous process) म्हंटले जाते. तसेच तो टोकदार असतो .घेरा

किंवा पिण्डमुल ज्या स्थानावर जुळतात त्याला चक्रमुल म्हणतात. (pedicle) मेरूदंड मान शरीराचा एक अस्थिमय आधार आहे हाच डोक्याचा देखील आधार आहे. हा आपल्या आतील भागामध्ये सुषुम्ना अथवा मज्जाला धारण करून असतो. हा पुढच्या बाजूला झुकु शकतो, आजू - बाजूला देखील काही प्रमाणात झुकु शकतो. परंतु, मागील बाजूस बिलकुल झुकु शकत नाही.

बैठक किवा उभ्या राहण्याच्या स्थिति मध्ये लक्ष दिले नाही तर मनक्याची बॉडी जेव्हा विस्कळीत होते. तेव्हा अस्थि क्षत अथवा घाव उत्पन्न होतो.

मेरूदंडा मध्ये ग्रैव – कशेरूक (cervical vertebrae) चा पिंड किवा 'पाच कटी–कशेरूक'(lumber vertebrae) चे पिंड क्रमशः समोरच्या बाजूला झुकलेले तसेच मागील बाजूस उभे असतात. त्रिक कशेरूक (sacral vertebrae) शरीराच्या भारला दोन्ही पायावर विभाजित करतात, ज्याच्यामुळे उभे राहण्याची आणि बसण्याची स्थिति संतुलित ठेवली जाते.

शिशु च्या जन्माच्या वेळे पर्यन्त हा 'पिंड' किंवा 'चाप' तयार होतो.जेव्हा शिशु एका वर्षाचा होतो त्या वेळी दोन्ही चाप मागील बाजूस जोडले जातात. तसेच तिथूनच 'कष्टक' सुरू होतो.

कशेरूकांचा अग्रभाग लांब तसेच ठोस असतो, ज्याला बॉडी म्हणजेच पिंड असे म्हणतात. या बॉडी च्या मागील तसेच बाहेरील भागापासून दोन्ही बाजूने दोन लांब हाडे निघतात, जी मागील बाजूस आपापसात जोडून एक मोठया छिद्राची निर्मिती करतात. या दोन्ही हाडांना 'चाप' (arch) असे म्हणतात. यांच्या द्वारे निर्माण झालेल्या छिद्राला 'कशेरुका छिद्र' (vertebral foramen) म्हणले जाते. 'सुषुम्ना' याच छिद्रा मधून मार्गक्रमण करत खालच्या दिशेला जाते.

दोन्ही चापांच्या (arch) मिलन स्थळाच्या ठिकाणी एक लांब तसेच टोकेरी हाड मागे तसेच खालच्या दिशेला झुकलेले असते ज्याला 'कंटक' (spine) म्हंटले जाते. चाप किंवा पिंड च्या संधि स्थळापासून एकेएक लांब हाड डाव्या किंवा उजव्या बाजूला जाते, याला 'अनुप्रस्थ प्रवर्ध'(Transverse Process) म्हंटले जाते.

'चाप' किंवा 'पिंड' च्या मिलन स्थळापाशी दोन्ही बाजूला वर तसेच खाली दोन खड्डे असतात, ज्यांना 'कशेरूक खात' असे म्हंटले जाते.

जेव्हा एक कशेरूक दुसऱ्या कशेरूकच्या वर बसतो, त्यावेळी कशेरूकाचा खालचा खात (खड्डा) तसेच वरचा खात हे दोन्ही मिळून एक–एक छिद्र बनले जाते, ज्यांच्याद्वारा सुषुम्ना तंत्रिकांचा (spinal nerves) प्रादुर्भाव असतो.

खात च्या समीप असणाऱ्या पिंडा पासून संयुक्त हाडांचे दोन पातळ आणि गोल गोल भाग वरच्या दिशेने उठलेले असतात. यांना 'फलक' म्हंटले जाते. हे पिंडच्या दोन्ही बाजूस असतात. जेव्हा एक कशेरूक दुसर्या' कशेरूक च्या वरती बसतो, तेव्हा हे फलक एक दुसऱ्याशी संयुक्त होतात.

प्रत्येक वरच्या तसेच खालच्या दोन कशेरुकाच्या मध्ये एकप्रकारची उपास्थिची गादी असते, ज्याला अंतर कशेरुका तंतु उपास्थि (intervertebral fibro cartilage) म्हंटले जाते. ही गादी कशेरूकांना परस्पर आघात लागण्या पासून वाचवण्याचे कार्य करते.

हे विवरण एक सामान्य कशेरुका' चे आहे. आता आम्ही वेगवेगळ्या कशेरूक विषयाबाबत वेगवेगळे लिहिणार.

'ग्रैव कशेरुका' किंवा 'ग्रीवा कशेरुका' (cervical vertebrae)

यांची स्थिति गळ्याच्या मागील बाजूस असते तसेच सामान्य कशेरूक प्रमाणे यांच्या रचनेमध्ये देखील काही अंतर असते. ह्या संखेने एकूण ७ असतात. 'ग्रैव कशेरुका' (cervical vertebrae) ची नळी (vertebral canal) 'वक्षीय कशेरुका' (thoracic vertebrae) च्या नळीला जोडलीली असते. वक्षीय कशेरुका च्या कंटकापेक्षा 'ग्रैव कशेरुका' कमी लांबीचा असतो. याचे दोन छोटे छोटे कंटक असतात, जे परस्पर मिळालेले असतात. याचा

अनुप्रस्थ प्रवर्ध तसेच पिंड देखील लहान असतो. ग्रैव कशेरुका चे अनुप्रस्थ प्रवर्ध किंवा चाप ज्या ठिकाणी मिळतात.

त्याठिकाणी दोन्ही बाजूला एक-एक छिद्र असते, ज्यापासून 'सुषुम्ना-तंत्रिका' निघते. याच्या व्यतिरिक्त 'वक्ष-कशेरुका' आणि 'ग्रैव-कशेरुका' मध्ये काही अंतर नसते.

प्रथम तसेच द्वितीय ग्रैव कशेरुका मध्ये काही भिन्नता असते, जे अन्य कशेरुका मध्ये नाही भेटत. यांच्या बाबतीत खालीलप्रमाणे समजून घेतले पाहिजे-

प्रथम ग्रैव कशेरुका – यालाच 'एटलस गुटिका' (atalas vertebrae) देखील म्हंटले जाते. पश्च-कपालास्थी (occipital bone) याच्याच वरती स्थित असते. या केशरुके मध्ये पिंड नसते, त्यापेक्षा याठिकाणी एक गोलफिरणारे लांब हाड असते, जे 'अग्र चाप' बनवते. याच्या मध्ये अग्रभागाच्या वरती एक मोठा 'तंतु' असतो जो या हाडाला डोक्याशी दृढतापूर्वक जोडून ठेवतो. याच्या दोन्ही बाजूला दोन मोठे खड्डे असतात, जे मध्य भागी झुकलेले असतात, यांच्या वरती मध्यकपालास्थि चा स्थूलक लागून असतो. याच्या पार्श्व भागामध्ये दोन छिद्रे असतात, त्यामधून 'प्रथम ग्रीवा तंत्रिका' (first cervical nerve) निघते. हे हाड एका छल्ले सारखे असते. याचा कंटक खूपच छोटा असतो तसेच पश्चकपालास्थी पासून प्रारंभ झालेली मांसपेशी त्याच्याच वरती येऊन लागलेली असते.

द्वितीय ग्रैव कशेरुका – यालाच 'अक्ष कशेरुका' (axis) देखील म्हंटले जाते. याच्या पिंडा मध्ये एक टोकदार भाग वरच्या बाजूला वरती आलेला दिसतो, ज्याला 'दंताभ प्रवर्ध' (odontoid process) म्हंटले जाते. याच्या वरील तोडर भागा वरती, पश्चकपालास्थी च्या निम्न भागापासून आरंभ होणारा एक खूप मोठा तसेच दृढ तंतु लागून असतो. याच्या पंडीच्या अग्रतलावरती एक खोल क्यारी बनलेली असते, ज्याच्या वरती प्रथम कशेरूक चा आग्रचाप येऊन जोडल्या जातो. या कशेरूकाचे अन्य भाग प्रथम ग्रैव कशेरुका सारखेच असतात.

टिपणी – अन्य सगळ्या ग्रैव कशेरुकांची रचना 'सामान्य कशेरुका' (ज्याच्या विषयी पहिले लिहिलेले आहे) प्रमाणेच असते.

वक्ष कोशेरूका – (thoracic vertebra) – हे संखेने एकूण १२ असतात. यांची स्थिति ग्रैव कशेरुका तसेच कटी- कशेरुका च्या मध्ये असते. हा वक्ष स्थलाच्या मागील घेराला निर्माण करतो. ग्रैव कशेरुकांची अपेक्षा यांचा पिंड मोठा असतो, परंतु कशेरुका - छिद्र (vertebral foramen) काही संकुचित असते.

याच्या दोन्ही बाजूला अनुप्रस्थ - प्रवर्ध (transverse process) असतात, जे बरगड्यांना चिकटलेले असतात. यांचा कंटक (स्पाइन) पातळ तसेच लांब असतो. याच्या शेवटी एक सर्वात छोट्या भागाच्या वर पाठीची मासपेशी असते.

कटी कशेरुका – (lumber vertebrae) – हे सखेने ५ असतात तसेच वक्ष कशेरुका आणि पिंड यांच्या पेक्षा मोठे असतात. यांच्या पार्श्वतलापाशी दोन्ही दिशेला वृक्क (kidney) असते. 'वक्षोदर मध्यस्थी' चा मध्यभाग यांच्या पिंडशी संयुक्त राहतो.

कटी कशेरूकाचा पिंड लांबीला गोल असतो याचा पूर्वतल उन्नतोदर तसेच पश्चदल नतोदर असतो. ऊर्ध्व किंवा निम्न भाग नतोदर तसेच खडबडीत असतो. याच्या वरती 'आंत्र कशेरुक चक्रिका' internal vertibal cartilage ची स्थिती राहते, याचा 'अनुप्रस्थ प्रवर्ध वक्षक कशेरुक' इतका लांब नसतो परंतु यापेक्षा अधिक आयताकृती असतो, याच्या द्वारे पाठीची मांसपेशी दोन्ही ठिकाणी चिकटलेली असते. याचे कशेरुका छिद्र देखील छोटे असते.

त्रिक कशेरुका अथवा त्रिकास्थि (sacral vertebrae) हे संख्येने ५ असतात परंतु एकमेकांशी जोडून राहिल्याने हे एक हाडाचे रूप ग्रहण करतात. यांची उपस्थिती किती कशेरुक तसेच अनुत्रिक कशेरुका च्या मध्ये असतात. यामध्ये वरचा पहिला कशेरुक मोठा तसेच चौडा असतो. तसेच खालच्या कशेरुका या दोन्ही hip bones च्या मध्यमध्ये स्थित होतात तसेच pelvis ची पश्चिमी सीमा चे निर्माण करतात. यांचे दोन धरातलं १. पूर्व तसेच २. पश्च

असतात. पूर्वतलं वरून खाली पर्यंत 'नतोदर' concave असतो तसेच मोठ्या आतड्यांचा अंतिम भाग याच्या संपर्कांत असतो. पूर्व तलामध्ये उजव्या तसेच डाव्या दोन्ही बाजूला ४-४ छिद्र असतात. याचा पश्चतल खडबडीत असतो आणि वरच्या भागामध्ये पाठी च्या मांस पेशीचा आकार तयार करते. यांचा खालचा भाग त्वचेने आच्छादलेला असतो. त्रिकास्थी चे पार्श्वतल चौडे आणि खडबडीत असतात. ते श्रोणी - अस्थी - पिंड च्या अभिमध्यतल ला जोडलेले असतात. ट्रेक श्रोणी फलक स्नायू (sacro iliac ligament) इथेच चिकटलेला असतो.

त्रिकास्थि चा खालील भाग वरिलभागाच्या तुलनेने अधिक पातळ, छोटा, तसेच समोरच्या बाजूला झुकलेला असतो. याचा खालील धरातलं 'अनुत्रिकास्थि' च्या संपर्कात राहतो. यापासून आरंभ होणारे दोन स्नायू अनुत्रिकास्थि ला जाऊन मिळतात.

अनुत्रिकास्थि Coccygeal Vertebrae – पुच्छ कशेरुका – या संख्येने ४ असतात ,परंतु परस्पर जोडल्याने ते एकच हाड म्हणून प्रतीत होतात, या मध्ये सर्वात वरील हाडे हि मजबूत असतात. हि हाडे समोरच्या बाजूस झुकलेली असतात तसेच सुषुम्ना चा अंतिम भाग (Felum Terminals) इथे येऊन समाप्त होतो.

अनुत्रिकास्थी चा खालचा भाग पातळ तसेच टोकदार असतो यापासून गुद उन्मनीका (Lavotor-ni) नावाची एक पेशी आरंभ होते. याच्या दोन्ही बाजूस दोन तंतू निघालेले असतात ज्यांना त्रिक गुलिकास्थि (Sacrotuberous Ligments) म्हंटले जाते.

वक्ष स्थळाचे हाड, वक्षोस्थि अथवा उरोस्थि (Sternum) : हे हाड वक्ष: स्थळाच्या मध्य भागामध्ये स्थित असते. याचा वरील भाग काही प्रमाणात चौडा तसेच निम्न भाग टोकदार असतो. हे हाड काही चपटे असते आणि माने पासून आरंभ होऊन पोटाची कौडी (Epigastrium) पर्यंत जाते. याच्या वरील चौड्या भागाला उरोस्थी मुष्ठी (Manubricum Stemi) मध्य भागाला पिंड (Body of the Sternum) तसेच खालच्य टोकदार भागाला उर: पत्रक (Xiphisternum) म्हणतात.

उरोस्थी मुष्ठी चा वरील भाग काही प्रमाणात गोल तर काही प्रमाणात दबलेला दिसतो. ज्याच्या दोन्ही किनाऱ्याला एक-एक खड्डे असतात ज्यामध्ये जंतुका अस्थि (Clavicle Bone) जुळलेली असते. एका प्रकारे याच स्थानावर संपूर्ण हाथचा धडाशी संबंध असतो. याचा निम्न भाग उरोस्थी पिंडाच्या वरील भागाला जुळेल असतो. हि दोन्ही हाडे ज्या ठिकाणी मिळतात त्या ठिकाणी दोन्ही बाजूला दोन खडडे असतात ज्यांच्या वेळ पातळ किंवा दुसरी बरगडी चा अग्रभाग जोडला जातो.

उरोस्थी पिंड चा लांब भाग वरून खाल पर्यंत असतो. याच्या दोन्ही बाजूला खड्डे बनलेले असतात ज्यामध्ये तिसरी, चौथी, पाचवी. सहावी आणि सातवी बरगडीचे अग्रभाग येऊन जोडले जातात याचा समोरील हिस्सा चामड्याच्या मागे असतो तसेच याच्या दोन्ही बाजूला (Pectoralis Major Muscles) संयुक्त राहतो.

उर : पत्रक खूप छोटा असतो याच्या पृष्ठ भागा पासून 'मध्यछदीका' (diaphragm) चा संयोग होतो. याच्या खालील भागा पासून दोन मांसपेशी आरंभ होतात. जी खालून जाऊन श्रोणी अस्थिला मिळते. या मांसपेशीला 'समदारिका' (rectus abdominis muscle) म्हंटले जाते.

विशेष-वक्षोस्थिच्या दोन्ही वरचे भाग कठोर अस्थिमय असतात तसेच निम्न भाग जीवनाच्या मध्य काळपर्यंत कोमल आणि लवचिक बनला जातो.

पर्शुका अथवा बरगडी (ribs) – बरगड्यांची हाडे संखेने २४ असतात. यांच्या द्वारे वक्ष: स्थल ची भिंत निर्माण होते. यांच्या मधील १२ बरगड्या वक्ष: स्थळाच्या उजव्या बाजूला आणि १२ बरगड्या डाव्या बाजूला असतात. **वक्ष** स्थळाच्या वरती आणि खालच्या बाजूला चौडा पिंजऱ्यात प्रमाणे असतो. उक्त १२-१२ बरगड्या मधील ७-७ बरगड्या समोरच्या बाजूला धडच्या मध्य भागी अर्थात वक्षोस्थिमध्ये जोडलेली असतात. या ७ बरगड्यांना पूर्ण पंजरास्थि (true ribs) म्हंटले जाते. शेवटच्या ५-५ बरगड्या वरील ३-३ बरगड्यांची उपास्थि ७ व्या बरगडीला जोडलेली असते. तसेच अंतिम २-२ बरगड्यांना 'झुठी बरगड्या' किंवा 'तरंगणाऱ्या बरगड्या' (floating ribs)

म्हंटले जाते. कारण यांचा एक भाग कशाला ही जोडलेला नसतो.

या ठिकाणी हे लक्षात घेण्यासारखे आहे की, सगळ्या बरगड्या वक्षोस्थिला एकदम जोडलेल्या नसतात. 'वक्षोस्थि' आणि बरगडी यांच्या मध्ये एक उपस्थि सारखे असते, ज्याला 'उपर्शुका' (costal cartilage) म्हणतात. हेच बरगड्यांना आणि वक्षोस्थीला संयुक्त करण्याचे काम करते.

पाठीच्या पहिल्या मणक्या पासून दोन्ही बाजूच्या पहिल्या बरगडया तथा वक्षोस्थि च्या वरील कडेला एक छिद्र असते ज्याच्या आतील भागामधून रक्तवाहिन्या निघून माने मधून वक्ष: स्थळामध्ये येते आणि अन्य अनेक नाडया याच छिद्रा मधून वरती जातात.

कोणत्याही मधल्या बरगडीच्या हाडाचे निरीक्षण केल्यास त्याचे खलील तीन भाग माहीत होतात.

१. अंतिम भाग २. मध्य भाग ३. अग्र भाग

१. अंतिम भाग (vertebral end) – हा भाग मागील बाजूस स्थित असतो तथा याचे १. डोके (head) २.मान (neck) ३. गलिका (tubercle) तीन भाग होतात. 'डोक्याचा' भाग गोल असतो आणि तो वक्ष: कशेरुकेच्या पार्श्वतल खड्ड्याला जोडलेला असतो. 'मानेचा' भाग.......... आणि लांब असतो आणि हा वक्ष: कशेरुका च्या अनुप्रस्थ प्रवर्धला जोडलेला असतो. 'गूलिका' वाला भाग उभारलेला असतो. हा एक दृढ असेच मोठ्या तंतुद्वारे अनुप्रस्थ प्रवर्ध (transverse process) ला जोडलेला असतो. हा भाग श्वास घेण्यावेळी तसेच सोडण्यावेळी 'अनुप्रस्थ प्रवर्ध' च्या एका बाजूकडून दुसरीकडे सरकत राहतो.

२. मध्य भाग (shaft) – हा भाग तिरपा, चपटा, आकुंचीत तसेच लांब आणि दोन किनाऱ्यावाला असतो. याचे बाहेरील धरतल गुळगुळीत आणि उन्नतोदर असतो. वरती असणारी बरगडी च्या बाह्य आणि आतील भागामध्ये 'त्रिक कंटिका' मांसपेशी (sacrospinatis) लागून असते. मधल्या हडापासून तिर्यक 'बहयोदरी' (external oblique) नावाची मांसपेशी निघते. खालच्या मसली पासून कटीपार्श्वछदिका (latisiums) नावाची मांसपेशी संयुक्त राहते. पार्श्व भागात ही हाडे समोर आणि खालच्या दिशेला झुकलेली असतात तसेच यांच्या बाह्य – धरातलवर त्वचा चढलेली असते.

मध्य भागाचा आतील भाग हा नतोदर असतो हा एक लांब धरातलाच्या उभाराद्वारे दोन भागांमध्ये विभक्त होतो. खलील भागामध्ये अंतरापर्शुका धमनी शिरा आणि तंत्रिकाजोडलेली असते. याचा वरचा आणि खालचा हे दोन किनारे असतात. वरील बरगडी च्या खालच्या किनाऱ्या पासून आरंभ होणारी दोन मांसपेशी खलील दुसऱ्या बरगडी च्या वरील किनाऱ्याला समाप्त होते. यांची नावे क्रमाश: 'बाह्य अंतरपर्शुका' आणि 'आभ्यंतर अंतरपर्शुका' असते.

फुफुसांचा पडदा किंवा फुफुसांचा संबंध बरगडीच्या हाडाच्या आतील धरातलशी असतो. बरगडीची सगळी हाडे वक्ष: स्थलविभिन्न अवयवांची रक्षा करण्याचे कार्ये करतात.

ऊर्ध्व शाखेतील हाडे (bones of the upper extremities) ऊर्ध्व शाखेमध्ये खांद्याच्या जवळून दोन्ही बाजूचे दोन्ही हाथ तसेच त्यांच्या अंशाची गणना केली जाते. खांद्याची निर्मिती म्हणजेच स्कंधास्थि किंवा कंठास्थी ला मिळून होते. तरीही कंठास्थी ची गणना ही ऊर्ध्वशाखेच्या हाडांच्या अंतर्गत केली जाते.

ऊर्ध्व दक्षिण तथा वाम असे दोन भाग पडतात. यांच्या प्रत्येक भागा मध्ये ३२–३२ हाडे असतात त्याप्रकारे ऊर्ध्व शाखांमध्ये एकूण मिळून ६४ हाडे असतात. ती खालील प्रमाणे –

१. कंठास्थी अथवा अक्षकास्थि अथवा जंतुकास्थि (clavicle) समोरच्या बाजूला – १
२. स्कंधास्थि अथवा अंशफलक (scapula) मागील बाजूस – १
३. प्रगंडास्थि (humors) हाथामध्ये – १
४. चक्रदंड अस्थि (radius) अग्रबाहू मध्ये – १
५. अंत: प्रकोष्ठास्थि (ulna), कोपऱ्यामध्ये – १

६. मणिबंध अस्थि (metacarpal bones) मनगटात		– ८
७. करभास्थी (metacarpal bones) हाथामध्ये		– ५
८. अंगुली अस्थि (phalanges) बोटांमध्ये		– १४
	(एकूण)	**– ३२**

वरील विवरण हे एका बाजूच्या ऊर्ध्व शाखातील हाडांचे आहे. ज्या प्रमाणे एका बाजूला एकूण ३२ हाडे आहेत या प्रमाणेच दुसऱ्या बाजूला ३२ हाडे असतात . ऊर्ध्व शाखेच्या विभिन्न हाडांच्या संबंधी विवरण पुढील प्रमाणे आहे–

१. कंठास्थी, अक्षकास्थी अथवा जत्रुकास्थी (clavicle) – हि हाडे संख्येने २ असतात, ती स्टर्नम च्या दोन्ही बाजूला वरच्या भागावर स्थित असतात. यांचे दोन भाग असतात –१. अभिमध्य २. पार्श्व. अभिमध्य चा अंत भाग हा गोल असतो आणि तो उरोस्थी च्या पार्श्व – अंत चपटा असतो जो स्कंधास्थी अथवा अंसफलक (scapula) च्या अंत भागाला जोडलेला असतो.

या हाडाचा वरील भाग फुफुसाच्या शिखराच्या जवळ असतो. याच्या ठीक मागे खालील भागात 'अधोजतूक' नावाची एक धमनी राहते.

२. स्कंधास्थि अथवा अंशफलक (scapula) – हे एक त्रिभुज आकार हाड आहे ,जी पाठीमध्ये दोन्ही बाजूला वरच्या बाजूला स्थित असते. याचे २ धरातळ, ३ किनारे तथा ३ उभार असतात. याचा १ धरातळ मागे ताठ १ समोरच्या बाजूला असतो. मागील धरातळ च्या वरच्या भागामध्ये एक तिरपी तथा उभरी हाड असते, ज्याला कंटक किंवा मणका (spine) असे म्हणतात. हा मणका स्कंधास्थी च्या मागील धरातळाच्या २ भागांना विभक्त करते, त्यामधील खालच्या चौड्या भागाला किंवा मोठा भागाला 'अध: अंशपृष्ठिका खात' (fass of infraspinata) म्हणतात या ठिकाना पासूनच अध: अंशपृष्ठिका (infraspinata muscles) नावाची मांसपेशी निघते spine चा वरील भाग संकुचित असतो. याला ऊर्ध्व अंश पृष्टी खात (Farsa Supraspinata) म्हणतात यापासून देखील एक मांसपेशी निघते.

स्कंधासाठी चा पश्चतळ उन्नोतोदर असतो आणि तो एक कंटक द्वारे दोन भागामध्ये विभाजित होतो, वरील भाग १/५ तसेच खालचा ४/५ आहे. वरील भागापासून ऊर्ध्व अंश पृष्ठिका (Surptaspinatus Muscle) नावाची एक मांसपेशी निघते तसेच खालच्या मोठ्या भागापासून अध : अंश पृष्ठिका (Infraspinatus Muscle) नावाची एक मांसपेशी निघते. Spine च्या वरच्या आणि चौड्या पार्श्व भागाला अंशकूट (eromion) म्हंटले जाते. इथे लगभग जतुकास्थि (Clavicle) ला जोडलेला असतो. याच्या वरील भागापासून एक 'त्रकोनिका' (Deltoid Muscle) नावाची मांसपेशी निघते.

अंश गर्त च्या वरतीप्रगंडस्थिवरचा भाग येऊन मिळतो. अंशगर्त च्या वरती हि तंड–प्रवर्ध (Coracoid Process) नावाचे एक वाकडे हाड लटकलेले असते. हा तंतू निर्मित एक मोठा संपुट (Capsule) असतो, हि प्रगंडस्थि ला चारही बाजूनी पकडून ठेवलेले असते. याला संधाय संपुट (articular Capsule) म्हणतात.

संधाय संपुट एवं प्रगंडस्थि च्या डोक्याच्या मागे एक तेलकट सारखा एक चिकट द्रव असतो जो प्रगंडास्थि ला अंशगर्त मधून चारीही बाजूने फिरवण्यास मदत करते. या तेलकट द्रवाला श्लेषक द्रव (Synovial Fluid) म्हणतात. स्कंधास्थी, जातुकास्थी (कंठस्थि) ताठ प्रगंडास्थि – हि तिन्ही हाडे ज्या स्थानावर मिळून एका संध्या ची निर्मिती करतात, त्या जागेला स्कंध संधी असे म्हणतात (Shoulder joint) हि संधी चेंडू च्या सारखी असते. हे हाथाचे हाड आहे – याचे तीन भाग होतात.

१. वरचा भाग, २. पिंड, ३. खालचा भाग

प्रगंडास्थि चा वरचा भाग (Upper End of Humerous) वरती स्कंधास्थि आणि खाली कर्पूर सन्धे (Elbow Joint) च्या मध्ये स्थित असतो. हा वरचा भाग खांद्याच्या संध्याशी जुळलेला असतो. याच्या वरील

भागाचे ४ विभाग होतात – १. डोके २. ग्रीवा ३. वृहत् गुलिका ४. गुलिका.

डोक्याचा भाग घड्याळाच्या आकाराप्रमाणे गोल आणि स्कंधारही च्या अंशगर्त ला जोडलेला राहतो. ग्रीवा चा भाग सँकरा असतो. याच्या वरील भागाचे ४ विभाग होतात – १. डोके २. ग्रीवा ३. दृटत् गुलिका ४. गुलिका.

डोक्याचा भाग घड्याळाच्या आकाराप्रमाणे गोल आणि स्कंधास्थि च्या अंभगर्त ला जोडलेला राहतो. 'ग्रीवा' चा भाग सँकरा असतो. याच्या चारहि बाजूला एक भरपूर मोठी तसेच दृढ पडदा लागलेला असतो, जो अंशगर्त आणि डोक्याला व्यवस्थित बांधलेला ठेवतो. या पडदयाला संघायक सम्पुट (Articular Capsule) म्हटले जाते. याच्या बाजूलाच 'वृटत गुलिका' राहते. 'लघु गुलिका' च्या वरती स्कंधास्थि आरंभ होणारी मांसपेशी राहतात. या मांसपेशी त्रिकोणिका जतुम आणि अंशकूर पासून आरंभ होऊन प्रगंडास्थि च्या वरील भागाला जोडलेली असते.

प्रगंडास्थिचा पिंड तिभुजाकार असतो. याच्या १. अग्र, २. अभिमध्य तसेच, ३. पार्श्व – या तीन धारा (Border) असतात. आणि तीन तल (Surface) असतात.

१. अग्रधारा किंवा अभिमध्य धारा च्या मध्ये असणारा भाग अग्र 'अभिमध्य तल'.

२. अग्र तथा पार्श्व धाराच्या मधील असणारा भाग 'अग्र' पार्श्वतल.

३. मागील भाग 'पश्च तल' म्हटले जाते.

अग्रधारा तथा अग्र अभिमध्य तल च्या वरील असणारी मांसपेशी ला 'द्विशरस्का' (Bleeps Musle) किंवा अग्र पार्श्व आणि पश्चतल च्या वरती असणारी मांसपेशी ला 'त्रिशिरस्का' (Triceps Muscle) म्हटले जाते.

प्रगंडास्थि चा निम्न भाग चौडा असतो आणि याच्या अभिमध्य एक पार्श्वधारा अधिक टोकदार असतात. याच्या निम्न भागात एक 'चक्रक' (Trochlea) असतो अन्तः प्रकोष्ठास्थि याच्या वरती राहून समोर तसेच मागील बाजूस फिरते. या Trochlea ला दोन्ही बाजूला हाडांचे दोन उभार असतात. ज्यांना क्रमशः

१. अभिमध्य अधिस्थूलक (Medial Epicondyle) आणि

२. पार्श्व अधिस्थूलक (Lateral Epieondyle) म्हणतात.

कर्पूरसंधि – प्रगांडस्थि, बहिः प्रकोष्ठास्थि तसेच, अन्तः प्रकोष्ठास्थि या तीन हाडांच्या द्वारे बनलेल्या संधी ला 'कर्पूर संधी' (Elbow Joint) म्हणतात.

बहिः प्रकोष्ठास्थि तथा अन्तः प्रकोष्ठास्थि (Radius and Ulna) हि दोन्ही हाडे अग्रबाहू मध्ये राहतात. अंगठ्याच्या बाजूला राहणारी हाडे यांना 'बहिः प्रकोष्ठास्थि' अथवा 'चक्रदण्ड आस्थि' (Radius) तथा कनिष्ठा अंगुली च्या बाजूला राहणारी हाडे जी 'अन्तः प्रकोष्ठास्थि' (Ulna) म्हणून ओळखले जाते.

उक्त दोन्ही हाडे एक दुसरी ला समांतर असतात तसेच त्रिभुणकार असतात. या दोन्ही हाडांचा अभिमध्य भाग टोकदार असतो. जो एकक अंतरास्थि कला नावाच्या झिल्ली द्वारे परस्परांना जोडलेला असतो हि सदृढ झिल्ली पडद्याच्यावरून खाली अशी पसरलेली असते.

बहिः प्रकोषठिस्थि (Radius) हे हाड अग्रबाहु च्या पार्श्व (Lateral Sick) मध्ये स्थित असते. याच्या वरील भागात सर्वात वरती एक गोल तथा छिछला घड्डा असतो, ज्याला 'बहिः प्रकोष्ठिता चक्रिका' (Radial Disc) म्हणतात, याच्या वरती प्रगंडास्थि चा सर्वात निम्न भागाचे डोळे येऊन मिळते. या चक्रिकाच्या खालील निमुळत्या भागाला 'ग्रीवा' म्हणतात. याच्या चारहि बाजूंना झिल्ली निर्मित एक तन्तु लपेटलेला असतो ज्याला 'वलयी स्नायु' (Annular Ligament) म्हटले जाते. ग्रीवा च्या खाली अभिमध्यस्थ तथा अन्तः प्रकोष्ठीकास्थि ने संयुक्त हाडाचा एक गोल भाग असतो, ज्याला 'बहिः प्रकोष्ठिका गुलिका' (Radius Tuberosity) म्हटले जाते. बहिः प्रकोष्ठास्थि चा मध्ये भाग त्रिभुजाकार तथा 'अभिमध्य' (Medial) च्या बाजूला झुकलेला असतो.

निम्न भाग चौडा आणि त्रिभुजाकार असतो. याचा अभिमध्य भाग हा नतोदर (अंतर्गोल) असतो आणि तो अन्तः प्रकोष्ठास्थि ला जोडलेला राहतो.

अन्तः प्रकोष्ठास्थि (Ulna) – हे हाड अग्रबाहु च्या अभिमध्ये मध्ये स्थित राहते. याचे तीन विभाग होतात – १) वरचा २) मध्ये किंवा पिंड ३) निम्न (खालचा) याच्या वरील भागाचे देखील दोन भाग होतात. तसेच या दोन्ही मागांच्या मध्ये भागात एक खड्डा असतो. वरच्या भागाला 'कर्पूर' (Olieranon) तसेच निम्न भागाला 'चंचु प्रवर्ध' (Coronoid Process) म्हणतात. 'कर्पूर' तथा चंतु प्रवर्ध च्या मध्ये एक गुहा असते, ज्याला 'चंचुखात' (Coronoid fassa) म्हणतात. 'चंचु प्रवर्थ' च्या खालच्या पार्श्व मध्ये देखिल एक खड्डा असतो, ज्याला 'बाह्य प्रकोष्ठिक खात' (Radial Notch) म्हणतात. बाह्य प्रकोष्ठास्थि तथा वृहत् गुलिका (Tuberos-ity) याच खड्ड्याला जोडलेली असते.

याच्या पिंड ची पार्श्वधारा खुप तेज असते तसेच अन्तरास्थि कला नावाची एक मोठी झिल्ली (पडद्याने) आवृत्त झालेली असते. याचा निम्न भाग वरच्या भागाच्या तुलनेत अगदी छोटा असतो. तथा प्रकोष्ठास्थि...... प्रकोष्ठास्थि ला जोडलेला असतो. तथा निम्न भाग कारभास्थियांना मिळतो.

करभास्थि (Metacarpal Bones) हि हाडे संखेने ५ असतात. हि हाथामध्ये असतात. हि आपल्या वरच्या भागाच्या मणिबंध अस्थिंच्या तसेच निम्न भाग मध्ये अंगुली अस्थिंना जोडलेली असतात.

अंगुली अस्थि (Phalanges) हि हाडे बोटांमध्ये असतात तसेच, संखेने १४ असतात. हि आपल्या वरच्या भागातील Metacarpal Bones सोबत संलग्न असतात. प्रत्येक बोटामध्ये ३-३ तथा अंगठ्यामध्ये २ हाडे असतात.

अधः शाखा ची हाडे (Bones of the Lower Extremities) –

अधः शाखेमध्ये एकूण कुल्हा पासून ते दोन्ही पायांपर्यंत तथा त्यांचे सगळे भाग येतात. उर्ध्व शाखेच्या प्रमाणे या शाखेचे देखील दोन-दोन भाग पडतात.

१. दक्षिण आणि २. वाम. या शाखेच्या प्रत्येक भागात ३१-३१ हाडे असतात. या प्रकारे अध शाखेत एकूण मिळून ६२ हाडे असतात. अधः शाखा च्या प्रत्येक भागामध्ये खालील प्रमाणे हाडांची संख्या मिळते –

१. नितंबात अस्थि (Osinnominatum or Hip bone)	–	१
२. उर्ध्वस्थि अथवा और्विकास्थि (Semur of thigh Bone)	–	१
३. जान्वस्थि (Patella)	–	१
४. संमुख जंघास्थि अथवा अन्तर्जंघास्थि – (Tibia or Shin Bone)	–	१
५. अनुजंघास्थि अथवा बहिर्जंघास्थि (Fibuka)	–	१
६. पादकूर्च्चास्थि (Tarsal Bones)	–	७
७. प्रपादास्थि (Metatarsal Bones)	–	५
८. अंगुलीस्थि (Phalanges of the toes)	–	१४
एकूण	**–**	**३१**

वरील विवरण हे अधः शाखेच्या एका बाजूचे आहे. अशाच प्रकारे हाडांची संख्या हि अधः शाखेच्या दुसऱ्या बाजूस असते. असे मिळून एकूण ६२ हाडे असतात. या हाडांचे विवरण खालीप्रमाणे –

१. नितंबास्थि (Osinominati or Hip Bone) – याची निर्मिती तीन हाडांनी होते – १) श्रोणि फलक (Ilium) २) आसनास्थि (Ischium) ३) जघनास्थि (Pubis) यांच्या पासून मिळून होते. या हाडांच्या पार्श्वमध्ये स्थित एक कटोरी सारख्या घड्ड्या ला 'उलूखल' (Aectabulum) म्हटले जाते. उलूखल च्या खाली एक मोठे छिद्र असते ज्याला 'गवास छिद्र' (Obturtor foramen) म्हणतात. या छिद्राच्या ३/४ भाग हा 'गवास कला' (Obturator foramen) नावाच्या एका मोठ्या तसेच सुदृढ पडद्या द्वारे झाकलेली असते. याच हाडाच्या

मागे असणाऱ्या खोल भागाला 'वृद्ध आसन खात' (Greater Setatic Notch) म्हणतात.

नितंबास्थि चा एक भाग हा 'श्रोणि फलक' आहे. इलियम च्या वरील फिरणाऱ्या भागाला शिखर (Crest) म्हणतात. शिखर च्या अग्रभागाला 'अधिअग्र' श्रोणि कंटक (Anterior Superior Iliac Spines) म्हणतात. यापासून एक मोठा तथा दृढ स्थायू निघून जघनास्थि वर पोहचून गुलिका मध्ये जोडल्या जातो. शेवटी या दोघांचा आकार इंग्रजी मतफ अक्षराप्रमाणे बनतो. याला 'वक्षण स्नायू' (Inguinal Ligament) म्हणतात. हा संपूर्ण उदराचा आधार बनून, जाँघेला उदरापासून वेगळा करतो. याच्या मध्यामध्ये, एक छिद्र असते. ज्याला 'वक्षण वलय' (Inquinal Ring) म्हटले जाते. या वलयाद्वारे १. और्बी शिरा २. और्बी धमनी ३. तंत्रिका - वरच्या जांधेत एक दुसऱ्याला समांतर प्रविष्ट होते.

उर्ध्वस्थि अथवा और्विकास्थि (Femur) –

हि जांघेची लांब मजबूत तसेच त्रिभुजाकार हाड 'नितंबास्थि' (Hip Bone) आणि अंर्तवंघिका (Tibia) च्या मध्ये स्थित असते. १) डोके (Head) २) पिंड (Body) ३. निम्न भाग (Lower End) हे तीन हिस्से असतात.

और्विकास्थि चे डोके (Head) छोट्या चेडू प्रमाणे गोल असते, ज्याच्या मध्या मध्ये एक खड्डा असतो. त्याला 'और्विका शिर गार्तिका' (Fovea Capites Semoos) म्हणतात. नितंबास्थि च्या उलूखल (Acetabutum) पासून आरंभ होणाऱ्या एक भरपूर मोठ्या 'गोलस्नायु' (Ligamentum Teres) याला लागलेल्या असतात. और्विकास्थि चे डोके वरच्या आतील भागाकडे झुकलेले असते. आणि उलूखल च्या खड्ड्याला ते येऊन मिळते. या दोघांच्या मध्ये एक चिकट तरल द्रव असतो, जो और्विकास्थि च्या डोक्या च्या गती ला सहाय्य करतो. और्विकास्थि ची ग्रीवा (Neck) डोके (Head) पेक्षा पातळ तसेच निमुळती असते आणि ती पिंडाला १२० अंश कोन बनविते. हि ग्रीवा प्रगंडास्थि च्या ग्रीवा पेक्षा अधिक लांब तसेच पिंड पासून वेगळी असते याच्या चारही बाबूंना 'संधायक संपुट' (Articular Capsule) लागलेले असते. ज्या प्रकारे प्रगंडास्थि मध्ये वृहत् गुलीक असते, त्याचप्रकारे और्विकास्थि मध्ये देखिल एक 'वृहत् ट्रोकेन्टर' (Greater Trochanter) असते. हे पार्श्वमध्ये स्थित असते. याचा पार्श्वतल उन्नोदर तसाच खडबडीत असतो, ज्याच्या वरती तुंडिका पेशी (Piri formis muscles) संयुक्त असतात. या हाडाच्या खाली अभिमध्य भागामध्ये 'लघु ट्रोकेन्टर' (Lesser Trochanter) नावाचे हाडाचा एक छोटा सा गोळा असतो.

और्विकास्थि चा 'पिंड' (Body) त्रिभुजाकार असते. ज्याचा आधार समोर च्या बाजूला तसेच शिखराच्या मागे असतो. याचे तीन तल असतात - १. अग्र २. पश्च ३. पश्चपार्श अभिमध्य तल च्या वरती क्रमशः तीन पेशी वरून खाली अशाप्रकारे लागलेली असते, जी नितंबास्थि मधून निघालेली असते. याच्या व्यतीरिक्त ३ अन्य मोठी तसेच मोठ्या पेशी देखिल असतात, ज्या जांघेच्या तीनही बाजूंनी आच्छादलेल्या असतात.

और्विकास्थि चा निम्नभाग (Lower End) चौडा तसेच मोठा असतो. हा 'अभिमध्य अधि स्थूलक' (Medial Epicondyle) तथा 'पार्श्व अधिस्थूलक' (Lateral Epicondyle) नावाचे दोन भाग झालेले असतात. यामध्ये पार्श्व अधिस्थूलक आकाराने काही मोठा तथा खालील बाजूला लटकलेला, अन्तर्जंधास्थि ला जोडलेला असतो.

जान्वस्थि (Patelia) –

गुडघ्याची संधी (सांधा) (Knee Joint) - च्या निर्मिती मध्ये १. औविकास्थि चा खालचा भाग, २. अन्तर्जघास्थि ३. बहिजंघास्थि ४. जान्वास्थि - या ४ हाडांचा सहभाग असतो. गुडघ्याच्या वरती वर आलेला भाग पहील्यांदा एका स्नायूच्या रूपात असतो. हा और्विकास्थि च्या निम्न भागाशी (Patella) आहे. पहिल्या ६ वर्षाच्या वयात या स्नायू चा मध्य भाग कडक हाडाच्या रूपामध्ये बदलतो. तेव्हा याला 'जान्वास्थि' (Patella) म्हणतात.

गुडघ्याच्या संधीला 'अभिमध्य' तथा 'पार्श्व स्वरित्क' (Medial and lateral cruciate Ligament) नावाचे दोन स्नायू व्यवस्थित जखडलेले असतात. 'अभिमध्य स्नायु' अंतर जंघिकाच्या अभिमध्य पासून सुरू होऊन और्विकास्थि च्या पार्श्व भागाशी जोडलेले राहतात तथा 'पार्श्व स्वस्तिक स्नायु' अंवर्जंघिकाच्या पार्श्व भागापासून आरंभ होऊन और्विकास्थिच्या अभिमध्य ला जोडलेला असतो. हे दोन्ही स्नायु एक दुसऱ्याला काप देऊन (Cross) स्थितीत राहतात. अंतर्जंखिका च्या अभिमध्य तथा पार्श्व मध्ये 'चक्रिका' (Disc) नावाची दोन हाडे असतात. अभिमध्य तथा पार्श्व भाग मध्ये उपास्थित – तन्तु पासून निर्मित या वलय चक्रिका वर और्विकास्थि चा निम्न भाग जोडलेला राहतो.

और्विकास्थि तथा अनार्जंधिच्या मध्यामध्ये एक 'श्लेषक कला' (Synovial Membrane) असते, ज्याच्या आतमध्ये एक तरल श्लेषक द्रव (Synovial Membrane) असते, ज्याच्या आतमध्ये एक तरल श्लेषक द्रव (Synovial fluid) असते. हा द्रव गुडघ्याच्या मुडण्याच्या क्रियेला मदत करतो. जानु संधी मध्ये, १) कुंचन (आकुंचन) २) प्रसार (प्रसरण) – या दाने प्रकारच्या गती असतात.

संमुख जंघास्थि अथवा अंतर्जंघास्थि (Tibia or shin Bone) हि पायाच्या खाली असणारी लांब, मजबूत तसेच मोठी हड्डी आहे, ज्याचा वरचा भाग मोठा तसेच चौडा आणि निम्न भाग पातळ तथा निमुळता असतो. याच्या वरच्या भागावरती २ गोल तसेच खड्डे असतात, डोक्याच्या आत और्विकास्थि चा निम्न भाग येऊन लागतो. याचे निम्न तथा मध्य हाडाचा एक उभार खालच्या बाजूला लटकत राहतो, ज्याला अभिमध्य गुल्फ (Medial Maleolus) म्हणतात. याचा अभिमध्य तल वरून खाली पर्यंत चिकट, चपटा तसेच गुळगुळीत, त्वचाच्छादित असतो. याच्या पार्श्व ची पार्श्वधारा मधून एक मोठी तसेच दृढ झिल्ली (झालर) लागलेली असते. जी याठीकाणा पासूनच आरंभ होऊन अनंजीधिकास्थि (Fibulla) ला जाऊन लागते. हि झालर किंवा पडदा पायांनादोन भागांमध्ये विभक्त करते. या झालर च्या सन्मुख भागाला (Anterior Portion) तसेच पृष्ठभाग ला (Posteriar Portion) म्हणतात.

अनुजंघास्थि अथवा बहिर्जंघास्थि (Fibula) –

हे पातळ हाड अंतर्जघास्थि (Tibia) च्या पार्श्व मध्ये तथा त्याच्याच समांतर राहते. याचे १) वरचा २) मध्ये ३) निम्न – हे तीन भाग पडतात. वरचा भाग आपल्या अभिमध्ये भाग मध्ये अंर्धवर्तुळाकार असतो तथा अन्तर्जंघास्थि चा पार्श्व तथा वरचा भाग मिळलेला असतो. याचा खालचा भाग चौडा असतो, ज्याला पार्श्वगुल्फ (Lateral Maleolus) म्हणतात. याचा मध्यभाग (Body) चामडीने आच्छादित राहते.

पादमूर्च्चास्थि (Tarsal Bones**) –**

हि हाडे भरपूर मोठी, जाडी, तसेच दृढ असतात. ती संखेने ७ असतात. त्यांच्या द्वारे 'टाचेची' निर्मिती होते.

प्रपादास्थि (Metatarsal Bones**) –**

हि हाडे देखिल जास्त दृढ तथा मोठी असतात. हि टाचेच्या हाडांशी तसेच पायाच्या बोटांच्या मध्ये स्थित राहते. हि संखेने ५ असतात. तथा यांचा निम्न भाग नतोदर असतो.

अंगुलीस्थि (Phalanges of the toes) –

हाथाची बोटाप्रमाणे पायाची हाडे देखिल एका बाजूला १४ अर्थात दोन्ही मिळून २८ च्या संखेने असतात. या प्रत्येक बोटात ३-३ तसेच अंगठ्यामध्ये २-२ दिसून येतात. पंजे तथा टाचेची हाउे एक हि धरातलावर स्थित राहत नाहीत, तर ते एक चाप बनवितात, ज्याच्यामुळे टाच अथवा पंजे हे जमीनीवर लागल्याने तळवा (Arch of foot) वरती उचलला जातो. या व्यवस्थेमुळे चालण्यास सहाय्य होते.

अभ्यासार्थ प्रश्न –

१) हाडांच्या ढाच्याला .... तंत्र म्हटले जाते.

२) मानव शरीरात एकूण .... हाडे असतात.

३) अस्थि तंत्र चे अष्टाय कंकाल तथा .... कंकाल दोन भेद आहेत.

२.८ सारांश :

प्रिय विद्यार्थ्यांनो, वरील विवरणामुळे तुम्ही समजून गेले असाल की अस्थि तंत्र मानव शरीर संरचना मध्ये कीती महत्वाचे आहे. आस्थि संस्था आपल्या शरीराला आकार तसेच दृढता प्रदान करण्याच्या बरोबर अन्य शारीरिक संस्थांनसाठी एक आक्षय स्थळाच्या रूपात देखिल कार्य करते. जरी अस्थिंचा ढाचा अर्थात कंकाल तंत्र जर नसता तर मांसपेशी कोठे असती. रक्त कोठून राहिले असते. अंतः स्त्रावी ग्रंथीचे अस्तित्व कशा प्रकारे सीाव झाले असते. याचप्रमाणे अन्य संस्थांच्या अंगासाठी जागा किंवा अक्षय कसे उपलब्ध झाले असते. अतः आस्थि तंत्र जरी आपल्या शारीरिक संरचना ची सर्वात स्थूल संस्थान आहे. तथापि याचेही तितकेच महत्व आहे जितके अन्य शरीराच्या संस्थांना आहे. एका कोणत्या संस्थेचे मिळून शरीर बनत नाही तर सर्व संस्था एकत्र मिळूनच संपूर्ण शरीराची रचना बनते तसेच सर्व संस्था या एकमेकांवर पूरक असून एकमेकांच्या कार्याशी निगडीत आहेत.

२.९ शब्दावली –

अस्थि पंवर	–	अस्थि तंत्र किंवा सांगाडा.
धमनी	–	अशा रक्त नलिका ज्यांच्यामधून ऑक्सिजन युक्त रक्त वाहते.
शिरा	–	ज्या रक्त नलिकांमध्ये अशुद्ध या कार्बनडाय ऑक्साईड युक्त रक्त प्रवाहित होते.
कपालास्थि	–	खोपडी चे हाड.
अधोहनुअस्थि	–	खालच्या जबड्याचे हाड.
ग्रीवा	–	मान.
कटि	–	कंबर.
पक्षीय	–	छातीवाल्या हिस्स्याशी संबंधित.
जान्वस्थि	–	गुडघ्याची अस्थि (हाड).

२.१० अभ्यास प्रश्नाची उत्तरे.

१) अस्थि तंत्र, कंकाल तंत्र

२) २०६.

३) अनुबंधीय कंकाल.

प्रकरण – ३
सांध्यांचे प्रकार आणि कार्ये प्रकरणाची संरचना

३.१ प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी याच्या आधील प्रकरणामध्ये आपण मानव शरीर संरचनेअंतर्गत पेशी, उत्ती आणि अस्थिंची संरचना तसेच कार्य या विषयांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्या अभ्यासाचा विषय आहे. सांध्याचे प्रकार तसेच कार्य अर्थात वेगवेगळ्या अस्थि एकमेकांमध्ये मिळून कशाप्रकारे सांध्याची निर्मिती करते या सांध्यांचे विभिन्न कार्य कोण कोणते आहेत, सांध्यामध्ये कोणकोणत्या गती असतात इत्यादी तर या विद्यार्थांनो, सगळ्यात आधी आपण हे समजून घेऊ की सांध्ये जोड कुणाला म्हटलं जाते किंवा कोणत्या आधारा नुसार यांचे वर्गीकरण केले जाते.

३.२ उद्देश

प्रिय विद्यार्थ्यानो प्रस्तुत प्रकरण वाल्यानंतर (अभ्यासल्या) तुम्ही –

* संधी कुणाला म्हणतात हे स्पष्ट करू शकता.
* संधींना वेगवेगळ्या श्रेणी मध्ये वर्गीकृत करू शकता.
* संधींमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या गतींचा अभ्यास करू शकता
* संधींची कार्ये स्पष्ट करू शकता.
* मानवी शरीरामध्ये आढळणाऱ्या प्रमुख संधींचा अभ्यास करू शकता.

३.३ संधीचे प्रकार

शरीराच्या सांगाडा ची रचना छोटी–मोठी, लांब–पातळ, चपटी–गोल अशा अनेक प्रकारच्या हाडांपासून मिळून तयार झालेली आहे. तसेच पेशी यांना शक्ती प्रदान करतात. परंतु गतीशील संधीपासून (सांध्यापासून) शरीराला गती देण्याची क्षमता प्राप्त होते. शरीरामध्ये जिथे कुठे दोन अस्थि (हाडे) अथवा .... एकमेकांना जोडली जातात तिथे जोड किंवा संधी तयार होते. संधीचे वर्गीकरण रचना तसेच गती च्या आधारावर केले जाते.

३.३.१ संरचनेच्या आधारावर संधीचे वर्गीकरण

संरचनेच्या आधारावर संधींना तीन वर्गामध्ये विभाजित केले जाते, जसे

१. तंतुमय संधी (Fibrous joints)

२. उपस्थिमय संधी (Cartilagionous joints)

३. साइनोवियल संधी (Synovial jonints)

३.३.२ गतीच्या आधावर संधींचे वर्गीकरण

गतीच्या आधारानुसार देखिल संधीचे तीन वर्गामध्ये वर्गीकरण केले जाते. ज्या सीनावर अस्थि (हाडे) एकमेकांमध्ये मिळून संधी बनवितात त्या ठीकाणी ते थोड्याप्रमाणात गती निर्माण करू शकतात, परंतु काही संधी अशा देखिल आहेत ज्यांच्यामध्ये गती करण्याची क्षमता बिलकुलहि नसते. काही संधींमध्ये स्वेच्छेनुसार गती करण्याची क्षमता असते. काही संधींमध्ये केवळ हलकी (Slightly) गती होऊ शकते. जसे –

१. अचल संधी (Immovable joints or synarthroses)

वायुमंडल मधून ऑक्सिजन चे ग्रहणकरण्याचेकार्ये श्वसन – संस्था करते. श्वसन संस्था च्या द्वारे शरीराची प्रत्येक पेशी ऑक्सिजन ची पूर्तता (supply) प्राप्त करते आणि पेशींद्वारे त्याचा उपयोग झाल्यानंतर त्याज्य पदार्थाच्या स्वरूपामध्ये कार्बन डायऑक्साईड वायू बाहेर काढते. वस्तुतः श्वसन क्रिया (respiration) पेशी तसेच

वातावरणीय वायू च्या मध्ये होणारा परस्पर विनिमय अर्थात आदान - प्रदान आहे.

श्वसन क्रिया वस्तुतः दोन पूर्णतःभिन्न भिन्न क्रियांचे प्रश्वसन (inspiration) आणि निःश्वसन (expiration) चे सम्मिलित रूप आहे. ज्याच्या क्रियेद्वारे वातावरणीय वायू ला आत मध्ये घेतले जाते, त्याला प्रश्वसन (inspiration) म्हंटले जाते, आणि ज्या क्रियेने त्याज्य वायू बाहेर काढला जातो त्याला , निःश्वसन (expiration) म्हंटले जाते. श्वसनाच्या एका प्रक्रिये मध्ये श्वास आतमध्ये घेणे तसेच पुन्हा बाहेर काढणे सम्मिलीत असते.


श्वसन - संस्था मध्ये या दोन्ही प्रक्रिया भिन्न भिन्न स्तरावर होत असतात. पहिली क्रिया कोशिका आणि वायुकोश (alveoli) च्या मध्ये होते, ज्याला 'बाह्य - श्वसन' (external respiration) अथवा 'फुफ्फुसीय श्वसन' (pulmonary respiration) म्हंटले जाते. तसेच दुसरी क्रिया रक्त कोशिका (capillaries) आणि पेशीच्या मध्ये होते, ज्याला 'अंत: श्वसन' (internal respiration) अथवा 'ऊतक श्वसन' (tissue respiration) म्हंटले जाते. या दोन्ही प्रक्रियांचे विस्तारपूर्वक वर्णन पुढे वायू विनिमय मध्ये केले आहे.

५.४. श्वसन संरचना आणि कार्ये



श्वास मार्ग (respiratory track) – नाकापासून ते फुफ्फुसीय वायुकोशांपर्यंत निरंतरता ने स्थित श्वसन अंगअसते, ज्यामधून वायू गमन करतो , श्वास मार्गाची निर्मिती करतो . हे क्रमानुसार स्थित असतात-

१. नासिक किंवा नाक (Nose)
२. ग्रसनी (Pharynx)
३. स्वरयंत्र (Larynx)
४. श्वास प्रणाली किंवा ट्रॅकिया (Trachea)
५. श्वास नळी किंवा श्वसनी (Bronchus/Bronchi)
६. श्वसनी (Bronchioles)
७. वायुकोश (Alveoli)
८. फुफ्फुस (Lungs)



नासिका किंवा नाक (Nose)

वातावरणामधील वायु श्वास मार्ग मध्ये सामान्यतः नासिकामधूनच आतमध्ये प्रविष्ट होतो. बाह्य नासिका, नाकाचा दृश्य भाग आहे जो नासिका अस्थि (Nasal bones) आणि कूर्चे द्वारे बनतो. यामध्ये एक मोठी गुहा बनते ज्याला नासिका गुहा (Nasal cavity) म्हंटले जाते, जो एक कुर्चा – निर्मित विभाजक – पडद्या (Nasal septum) द्वारे डावा आणि उजवा दोन्ही बाजूला भागांमध्ये विभाजित होते. नासिका गुहा मध्ये विभाजित झाल्याने त्याच्या पुढे (बाहेरील बाजूस) आणि माघील दोन-दोन (Nostrils) अथवा 'अग्र नासारंध्र (Anterior nares) म्हणतात, ज्यामुळे बाहेरून आतील बाजूला हवा घेतली जाते. तसेच मागील बाजूस जे छिद्र राहते, त्याला 'पश्च -नासारंध्र' (Posterior nares) म्हंटले जाते, जे ग्रसनी (Phrynx) पर्यंत हवा घेऊन जाते.

नासिका गुहा चा वरचा भाग (Roof) इथमॉइड अस्थीचा छिद्रित प्लेट (Cribriform plate of ethmoid bone), स्फिनॉइड अस्थी तसेच फ्रन्टल अस्थीद्वारेबनतो, आणि याचा तळ (Floor) तोंडाच्या छतावर स्थित कठोर आणि कोमल टाळू पासून बनतो.

कठोर टाळू मॅक्झीला अस्थि आणि पॅलेटिन अस्थी मिळून बनलेला असतो आणि कोमल टाळू अनैच्छिक पेशी चा बनतो. याची पार्श्व भित्ती मॅक्झीला अस्थी, पैलाटाईन अस्थी ची व्हर्टिकल प्लेट, इथमॉइड अस्थी तसेच

टर्बिनेट अस्थी (Turbinate bones) पासून बनते.

गुहेला विभाजितकरणारानासिका पट (Nasal septum) चा मागील भाग इथिमोईड अस्थी च्या अभिलंब पट्टी (perpendicular plate) आणि वोमर अस्थी च्या द्वारे बनलेला असतो तसेच पुढचा भाग काचाभा उपास्थी (Hyaline cartilage) चा बनलेला असतो, नासिक पट पासून नासिक गुहा ची मध्यवर्ती भित्ती बनते.

नासिक गुहांमध्ये दोन्ही बाजूला पार्श्वीय भित्ती मध्ये वर्तुळाकार असणारी तीन तीन वक्र अस्थी प्लेट सापडतात, ज्यांना सुपीरियर, मीडियल आणि इंफेरियर नासा-शुक्तिका (Nasal Conchae) म्हणतात. सुपीरियर आणि मीडियल नेझल कॉन्की इथमाइड अस्थी चेउभार (Projection) असतात आणि इंफेरियर नेझल कोनकी स्वतः एक अस्थी असतात, ज्याला टर्बिनेट अस्थी देखील म्हणतात. या तिन्ही नेझल कोनकी पासून नासिक गुहा चा प्रत्येक वरचा, मध्य आणि खालचा भाग ३ नासिक मार्गांमध्ये विभाजित होतात. हे वायू मार्ग (Meatuses) होतात आणि नासा ग्रसनी (Naso-pharynx) कडे जातात . या तिन्ही नेझल कोनकि मुळेच नासा श्लेष्मिक कलेचे क्षेत्र वाढते, आणि वायू जो तिकडून जातो, अधिक विस्तृत क्षेत्राला पार करतो, ज्यामुळे वायूपटलंपहिल्या पेक्षा जास्त गरम (Warmed) आणि नम (Moisturized) होते. नासिक पटलं दोन्ही बाजूला मोठी श्लेष्मिक कला (Mucous membrane) ने झाकलेली राहते. सुपीरियर नेझेल कोनका च्या वरती राहणारी श्लेष्मिक कलेमध्ये घ्राणेंद्रिय चे अंग (Organ of the scenes of smell) अवस्थित राहतात. मीडियल आणि इन्फिरियर नेझल कोनका च्या वरती श्लेष्मिक कला रक्त कोशिका मधून परिपूर्ण अति वाहिकामय (Highly vascular) राहते.

प्रत्येक नाकाच्या (Nostril) च्या अगर नासारंध्र (Anterior Nasal Nares) या बाह्य छिद्र, आत नासा - प्रघाण (Vestibule of the nose) मध्ये उघडते. नासा-प्रघाण मध्ये स्तरित उपकला पसरलेलं असते, जी बाह्य त्वचेमध्ये विलीन होऊन जाते. अग्र नासारंध्र च्या सरफेस वर काही तैल ग्रंथी (Sebaceous glands) राहते. याच स्थानावर काही द्रुढ केस देखील राहतात. नासिक गुहेच्या शेष भागाची भित्ती रोमक स्तंभाकारउपकला (Cilia ted columnar epithelium) ने बनलेली आणि श्लेष्मिक कला पासून अस्तिरीत असते. या मध्ये श्लेष्मा स्त्रावी चषक कोशिका (Goblet or mucous cells) राहते. ज्यांच्या मधून स्त्राव निघून नासिकची श्लेष्मिक कला नम, चिकट आणि चिपचिपीत राहते. नाकामध्ये विद्यमान केस, धूळ, आणि सुष्म जिवाणू आदी आतमध्ये जाण्यापासून रोखतात आणि वायू ला गाळण्याचं कामकरतात. हे सुष्म धुळ कणतसेच जिवाणू श्लेष्माला चिपकतात , श्लेष्मिककलेचे रोम, श्लेष्म लागिळणे किंव्हा कफाच्या रुपातबाहेर काढण्यासाठी ग्रसनी (Pharynx) मध्ये पोहचवतात.

पुढील नासिका रंध्र आणि मागिल नासिका रंध्र या व्यतिरिक्त नासिका गुहे मध्ये अजुन छिद्र (Openings) असतात जे खालीलप्रमाणे आहेत.

१. परानांसा विवर (Paranasal Sinuses) -

हे चेहऱ्याची हाडे आणि कपोल प्रदेशात स्थित हाडांमधील बंद गुकहा असते, ज्यात वायु भरलेला असतो. ह्यांना वायु विवर (Air Sinuses) सुद्धा म्हटले जाते. ह्या हाडांना ढिले करते आणि आवाज, निघण्यासाठी (गुजऱ्यासाठी) ध्वनि कोष्ठाचे कार्य करते फ्रेन्टल साइनस नेगगुहेच्या वर फन्टल अस्थिच्या मध्य रेखेच्या बाजूला स्थित असते इथमांइड साइनसेस (Ethmoid Sinuses) बऱ्याच प्रमाणात असतात आणि नाकापासुन नेगगुहेचे पृथक असणारे इथमॉइड अस्थिच्या भागात स्थित असते स्फीनॉइड साइनस स्फीनॉइक अस्थिच्या मुख्य भागात स्थित असतात सर्व वायु विवर अथवा पैरानेजल साइनसेस शैष्मिक कला याने अस्तरित असते. आणि सूक्ष्म छिद्र (Fociamen) द्वारा नासिका गुहेमध्ये उघडते नवजात शिशुमध्ये आढळत नाहीत. नासिका गुहेमध्ये संक्रमण जसे खोकला आदि होते तेव्हा हे देखील संक्रमित होतात, ज्यामुळे ह्यात सुज येते ह्या रोगाला साइनुसाइटिस (Sinusi-tis) म्हटले जाते.

परानासा विवर ह्याचे विस्तारपूर्ण विवरण पूर्वी केलेले आहे.

२. नासाअश्रुवाहिनी (Nasolacrimal duct) चे छिद्र –

नासाअश्रुवाहिनी प्रत्येक डोळ्यामधुन निघुन नासिका गुहा मध्ये उघडते; ज्यामुळे अत्याधिक अश्रु नाकामध्ये पोहोचतात हेच कारण आहे. रडतांना नाकातुन पाणी येण्याचे

ग्रसनी (Pharynx) –

नासिकेमधुन प्रवेश केलाला वायु, नाक मार्गाला पार करून ग्रसनी मध्ये पोहोचते ग्रसनी चा वरचा भाग स्फीनॉइड अस्थि च्या मुख्य आशाद्वारे बनते तसेच कालचा भाग ईसोफेगस सोबत मिसळतो. हे कपाळा आधाराच्या जवळ तसेच नासिका गुहा मुळ गुहा (oral cavity) आणि स्वर यंत्र यांच्या मागे स्थित 12 ते 14 रोगी लांब एक पेशीय नळी असते, ज्याची वरची सिरा चौडी असते. ॲनाटॉमीच्या दृष्टीने ग्रासनी ला वरपासुन ते खालपर्यंत खालील ती भागात विभाजित केलेले आहे.

१. नासाग्रसनी किंवा नेणोफैरिन्वस (Nasopharynx) –

हा ग्रसनीचा नासिका गुहेच्या मागे कोमल टाळुच्या स्तरच्या वरचा भाग असतो ज्यात ज्यात पुढे नासारंध्र (Posterior nasal pores) येऊन उघडतात त्या ह्याच्याच मागे श्रवणीय नलिका (Auditory tubes) उघडतात, ज्यातुन वायु दोन्ही बाजुला मध्य कानापार्यंत (Ear drums) पोहोचताता नासिका गुहेसमान नासाग्रसनी रोगयुक्त शैष्मिक कलेप्रमाणे अस्तरित असते, जी आत ओढलेल्या वायुला स्वच्छ करण्यात मदत करते. नासाग्रसनी च्या मागच्या भिंतीवर ह्याच्या छता (Rool) ला लटकलेल्या लसीकाभ पेशीच्या फुगवरा (उभार) असते. ज्याला फैरिन्प्यिल टॉन्सिल्स किंवा एडीनॉइड्स (Adenoids) म्हटले जाते. एडीनोइड्स वाढल्याने किंवा प्रदाहित (सुजल्याने) ग्रसनीमध्ये रूकावट होते ज्यामुळे, विशेषकरून लहान मुल तोंडाने श्वास घेवु लागतात. श्रवणीय नलिकांचे मुखद्वार बंद होऊ शकतात तसेच बोलण्या कठिनाई येवू शकते.

२. मुळा–ग्रसनी किंवा औरोफैरिक्स (Oropharynx) –

ह्या ग्रसनीया मुख गुहा (oral cavity) च्या मागचा भाग असतो, जो कोमल टाळु ने कंडच्छद (opiglotties) पर्यंत असतो, जेथे श्वसनीय आणि पचन मार्ग (Respiratory & digestive tracts) श्वास प्रणाल आणि ग्रासनली च्या रूपात वेग–वेगळ्या होतात. ओरोफैरिन्क्स आणि लैरिन्जोफैरिन्क्स च्या पेशी भिंतिका निगलन्याच्या क्रियेमुळै कलामय संकीर्ण पथाच्या एकजोड ज्याला गाळतोरणिका किंवा फोसेस (Fauies) म्हटले जाते. त्यापासुन वेगळा होतो जो तोंडाद्वारे तीव्र आणि छिछले श्वसन (Panting) च्या दरम्यान उघडून चौडा होतो ओरोफैरिन्स रेट्रटिफाइड स्वेमस एपिथीलियम ने अस्तरित असता. ओरोफैरिन्क्स ची पार्श्वीय भिंती कोंमल टाळु सोबत मिळालेली असते. ह्या भिंतीच्या दुमड्यामध्ये (Folds) ज्यांना पैलेटो–ग्लॉसल आर्चेज म्हटले जाते, लसीकाम पेशीच्या फुगवटे असतात. ह्यांना पैलेटाइन टॉन्सिल्स (Palatine tonsils) म्हटले जाते.

३. स्वरयंत्रज ग्रसनी किंवा लैरिन्जोफैरिन्क्स (Laryngeno pharynx) –

हा ग्रसनाचा सर्वात खालचा भाग असतो, जो हॉयड अस्थि (Hyoid Bone) चे स्तर ने स्वरयंत्र च्या माग पर्यंत असतो. ग्रासनी च्या याच भागामुळे श्वसनीय तसेच पाचन संस्था वेग–वेगळ्या होतात पुढील भागातुन वायु स्वरयंत्र (Lasynx) मध्ये जाते आणि भोजन मागच्या बाजूने ईसोफेगस मध्ये जाते

४. स्वरयंत्र किंवा लैरिन्वस (Larynx) –

स्वरयंत्र वर लैरिन्जोफैरिन्क्स आणि खाली श्वासनळी ला जोडलेले असते. ह्याच्या वर हॉयड अस्थि आणि जिव्हा खालचा भाग असतो. पुढे मानेच्या पेशी आणि मागे लैरिन्जोफैरिन्क्स आणि सर्वाइकल वर्टेब्रा असतो. दोन्ही भागात थइरॉइड ग्रंथीचे खंड असतात. हा श्वास नलीकेचा सर्वात वरचा भाग असतो जो खाली सातव्या र्स्वाइकल वटिब्राचा सारा वर श्वासप्रणाल या ट्रैकिया मध्ये उघडतो. स्वरयंत्रानेच स्वराची उत्पत्ती होते. बोलण्याच्या वेळी

ह्यात स्थित स्वर रज्जुमध्ये (Vocal cords) कंपन निर्माण होतात. त्यामुळे ध्वनी उत्पन्न होते. संपूर्ण स्वरयंत्रचे निर्माण काही असमाकृति उपस्थियो मुळे होतो. जो आपापसात लिगामेटस आणि पडद्या द्वारे संलग्न असते, खालीलप्रमाणे असता.

थायरॉयड उपास्थि (Thyroid cartilage) –

ही उपस्थि दोन चपटे तुकडे किंवे प्लेटो (Lamince) ने बनलेली असते, जी समोरच्या बाजूला मध्य रेखावर एकमेकांना जोडून एक तीक्ष्ण कोण (Acute angle) बनवते, जी मानेच्या पुढील भागात एक पुढे आलेला स्वरयंत्रण उभारच्या स्वरूपात दिसून येते, ज्याला एडम्स एप्पल (Adam's apple) म्हटले जाते. सर्वसाधारण ह्याला टेंगुळ (टेटुआ) म्हटले जाते. त्याच्या वर भागात व्ही च्या आकाराचा एक गड्डा किंवा नॉच (Notch) असतो. ज्याला थाइरॉयड नॉच म्हटले जाते. थायरॉयड उपस्थि मागे अपूर्ण रहाते आणि प्रत्येक प्लेट च्या मागच्या टोकापासुन प्रवर्ध तयार होतात. ज्यांना उर्ध्व आणि निम्नश्रृंग (Comuna) म्हटले जाते. थायरॉइड उपस्थि स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये मोठी असते. ज्यामुळै पुरूषांमध्ये ही अधिक स्पष्टपणे दिसु शकते. वरचा भाग स्ट्रटिफाइड, एपिथीलियम आणि खालचा भाग सिलिएटेड एपिथीलियम ने आस्तरित असतो.

एरिटीनॉयड उपास्थि (Anytenoid Cartilages) –

हे क्रिकॉयड उपास्थिच्या चौडा जो भाग आहे त्यावर पिरॅमिडच्या आकराची डाइलिन उपस्थि ने निर्मित दोन छोट्या-छोट्या रचना आहेत, ज्याने स्तरयंत्राची मागची भिंत तयार होते. याने स्वर रज्जुंचे लिंगामेन्टस आणि पेशी संलग्नीत राहतात.

कंठच्छद किंवा एपिग्लॉटिस (Epiglottis) –

ही पिवळ्या प्रत्यास्थ उपास्थि (yellow elastic cartilage) ने निर्मित पानाच्या आकाराची एक प्लेट असते, जी थयरॉइड नॉच च्या ठीक खाली थइरॉइड उपास्थिच्या अग्रं भिंतीच्या आंतरिक पृष्ठीागाला संलग्नित असते. ही थोडी तिरकी होवून वर जावून जिव्हेच्या मागे आणि स्वरयंत्राच्या वर स्थित असते. ही स्ट्रैटिफाइड स्वेचमस एपिथीलियम ने अस्तरित असते. याचे मुख्य कार्य. गिळण्याच्या क्रिये दरम्यान स्वरयंत्राचे द्वार (opening) ज्याला ग्लॉटिस (Glottis) म्हटले जाते. त्याला बंद करते (आच्छादित करते) ज्यामुै आहार (अन्न) श्वसन मार्गात जावु शकत नाही. श्वसन क्रियेदरम्यान ग्रासनली किंवा इसोफेगस ला झाकण्याचे काम सुद्धा हेच अंग करते.

या व्यतिरिक्त, स्वरयंत्रात, क्यूनिफॉर्म उपस्थि आणि कॉर्निकुलेट उपास्थि (Cuneiform cartilage) पण असते (रहाते) ह्यांची रचना अतिशय सुक्ष्म असते.

स्वर-रज्जु (Vocal cords) –

स्वरयंत्र किंवा लैरिन्वस च्या आधारावर समोरील भागात थयरॉइड उपस्थि च्या फुगवण्याची आंतरिक भिंतीपासुन आरंभ होवुन मागे एरिटीनॉयड उपस्थिपर्यंत पसरलेली, दोन्ही बाजूना इलास्टिक संयोजी पेशीच्या तंतुच्या दोरीच्या समान निर्मित रचना असते, ज्यांना वास्तविक स्वर रज्जु (Trail Vocal Cords) म्हटले जाते. वास्तविक स्वर रज्जुच्या वर आणि जवळच प्रघाणी दुमडी (Vestibitar folds) चा एक जोड स्थित असतो, ज्याला प्राय कूट स्वर रज्जु (False vocal cords) म्हटले जाते. यांचा स्वर उत्पन्न करण्यात विशेष योगदान नसते.

जेवहा लैरिन्वसच्या पेशी संकुचित होतात तेव्हा एरिटीनॉयड उपास्थि स्वर रज्जुना जवळ-जवळ घेवून जाते आणि त्याच्यामधील जागा अरूंद होते आणि तयार होत निश्वसन (Expination) चे तर स्वर रज्जु कंपित होतात आणि ध्वनि उत्पन्न होते. जेवहा स्वरयंत्रज पेशी शिथिल (Relwed) होतात तेव्हा उपस्थि बाहेरील बाजूस फिरतात, ज्यामुळे स्वर रज्जु एक दुसऱ्यापासून बाजूला होतात आणि विस्फारित होवुन जाते, ज्यामुळे कोणताही ध्वनी उत्पन्न होत नाही. ध्वनि चे तारत्व (Pitch) रज्जुंची (Cords) लंबाई आणि त्यातील तनाव ह्यावर अवलंबुन असते.

ज्यामुळे स्वर रज्जुमध्ये प्रकंपन (Vibratian) होते. वाढलेला तणाव उंच स्वर आणि कमी तणाव मंद्र स्वर उत्पन्न करतात. विभिन्न शब्दांच्या रूपात ध्वनिचे परिवर्तन, ओठ, जीभ आणि कोमल टाळुच्या पेशींच्या कार्यावर निर्भर असते.

श्वास प्रणाल किंवा ट्रैकिया (Trachea) –

श्वास प्रणाल किंवा श्वासनली (windpipe) स्वरयंत्र (Larynx) च्या खालुन आरंभ होवुन फुप्फुसांच्या शीर्षापर्यंत पोहोचणारी नळी असते जेथे ही दोन शाखा, उजवी आणि डावी श्वसनी किंवा ब्रोकाई (Bronchi) मध्ये विभक्त होते. आणि प्रत्येक फुप्फसामध्ये प्रविष्ट होते. ही जवळ जवळ १२ सें. लांब नळी असते. श्वास प्रणाल चा वरचा भाग त्याच्या समोर थयरॉइड ग्रंथी चा इस्थमस क्रास असतो आणि महाधमनी चा आर्च खालील भागाच्या समोर स्थित असतो. ह्यासोबत स्टर्नम चा मेनयूब्रियम सुद्धा समोरच्या भागात रहातो. ग्रासनली किंवा ईसोफेगस ह्याच्या मागे स्थित असते, जी ह्याला थॉरसिक बर्टिब्रा पासुन विलग ठेवते.

श्वास प्रणालची निर्मिती १६ ते २० आकृतीच्या उपस्थिच्या अपूर्ण द्वारे होते जे एकमेकांवर स्थित राहुन आपापसात प्रत्यास्थ तंतु पेशी (Fibroelastic connective tissues) आणि लंबवत् मऊ पेशी (Longtudinal smooth muscle) द्वारे जोडलेली असते Rings (छल्ले) ची मागची बाजु जी तंतु उतक आणि पेशींनी मिळून तयार झालेली असते, ईसोफेगस जवळच असते. श्वास प्रणालच्या ह्याभागाल उपास्थिथा यांचा सहारा नसतो.

श्वास प्रणालची आंतरिक सतह चषक पेशी (Goblet cells) ने युक्त स्तभांकार उपकला ने अस्तरित असते. चषक पेशी एक प्रकारचे श्लेष्म स्त्रवित करते, ज्यामुळे रामस्त श्वास प्रणाल गुळगुळीत (मऊ) रहाते. ह्यांच्या अस्तरांची (Lining) रोमिका (Cilia) स्वरयंत्राकडे अर्थात वरच्या बाजूला गति करते. श्वासासोबत ओढलेल्या वायु सोबत आलेले धूळीचे कण आणि सुक्ष्मजीवाणु (नासिका आणि ग्रसनी ला पार करून) श्वास प्रणाल रोखून ठेवते आणि रोमिकांच्या गतीच्या वर मध्ये पोहोचुन ह्यांना गिळतो किंवा बाहेर फेकतो (Spit out).

श्वास प्रणाल पाचव्या थोरॅसिक बर्टिब्रा च्या स्तरावर डाव्या आणि उजव्या अशा दोन भागात विभाजित होते. त्यांना श्वसनि किंवा ब्रोंकाई (Bronchi) म्हटले जाते. दोन्ही डावी आणि उजवी श्वसन प्रत्येक डाव्या आणि उजव्या (Brachi) फुप्फुसांत प्रवेश करते. फुप्फुसांमध्ये प्रवेश केल्याबरोबर ही अनेक छोट्या-छोट्या शाखांमध्ये विभाजित होते. उजवी श्वसनी (Bronchus) डाव्या पेक्षा लहान आणि चौडी असते आणि ही प्रथम श्वास प्रणाल मध्ये असते फुप्फुसांमधे प्रविष्ट झाल्यानंतर हाइलम वर ही तीन शाखांमध्ये विभाजीत होते, ज्यातुन एक एक शाखा फुप्फुसांच्या उर्ध्व, मध्य आणि निम्न खंडांत (lobes) जाते. प्रत्येक शाखा पुन्हा अनेक छोट्या-छोट्या उपशाखामध्ये ज्यांना श्वास नलिका (Bronchioles) म्हटले जाते. मध्ये विभाजीत होत.

डावी श्वरांनी उजव्या श्वसनी पेक्षा लांब आणि संकटी असते. डाव्या फुप्फुसांत प्रविष्ट झाल्यानंतर ही दोन शाखांमध्ये विभाजित होवुन फुप्फुसांच्या वरच्या आणि खालच्या खंडात जाते आणि पुन्हा छोट्या-छोट्या उपशाखांमध्ये, श्वसनिकांमध्ये विभाजीत होतात.

श्वसनि (Branchi) च्या भिंतींमध्ये उपास्थि आणि श्लैष्मिक ग्रंथी मध्ये उपास्थि आणि शैष्मिक ग्रंथी उपस्थित असतात आणि रोमक स्तंभाकार उपकला (Ciliated columnan epithelium) ने अस्तरित असते.

श्वसनिका किंवा ब्रोन्कियोल्स (Bronchioles) –

प्रत्येक श्वसनी (Bronchas) फुप्फुसांच्या खंडात प्रवेश केल्यानंतर अनेक सुक्ष्म शाखा उपशाखा किंवा ब्रोन्कियोल्स म्हटले जाते. यात उपास्थि नसते. परंतु पेशीय, तंतुमय आणि लवचिक ऊतक पासुन बनलेली असते. ह्यात सुद्धा श्वसनी प्रमाणे रोमक स्तंभाकार उपकला याचे अस्तर असते. जसे जसे ब्रोन्कियोल्स लहान होत जाते. तसे-तसे पेशी आणि तंतुमय ऊत्तक समाप्त होत जाते आणि अगदी लहान नलिक ज्याला टर्मिनल ब्रोन्क्रियोल्स (Terminal Brorchnioles) म्हटले जाते. ही चपटी-पतली उपकलेची कोशिका प्रमाणे एक दुमडी प्रमाणे बनलेली असते.

वायुकोषीय नलिका आणि वायुकोशिका (Alveolar ducts and Alveoli) –

टर्मिनल ब्रोन्कियोल्स निरंतर बऱ्याच शाखा विभाजित होवुन अनेक सुक्ष्म नलिका, ज्यांना वायुकोषीय नलिका (Alveolar ducts) म्हटले जाते बनते जी अति सुक्ष्म वायुकोष (Air Sacs) ज्यांना वायुकोष (Alveoli) म्हटले जाते, त्यात उघडते. वायुकोष फूले–फुले आणि अंगुरच्या गुच्छांप्रमाणे असते, ज्यामुळे फुप्फुसांचा आंतरिक तळाचे क्षेत्रफळ अत्यधिक वाढते. जेथे गॅस चे आदान–प्रदान होते. ह्यांच्या भिंती सिम्पल एक्वेमस एपिथीलिय ने आस्तरित असते.

फुफुस हे श्वसन संस्थेचे मुख्य अंग आहेत. संख्येत हे दोन आहेत. डावा आणि उजवा भाग. अधिकांश पक्षीय गुहांमध्ये समाविष्ट आहेत. मीडिया स्टाइनमम्हणजे मध्यस्थानीका हे दोन्ही फुफुसांमधिल अवकाश आहे. ज्यामध्ये हृदय आणि मोठी रक्तवाहिनी, श्वास प्रणाली (Trachea), esophagus, thoracic duct, थाइमस इत्यादी ग्रंथी आहेत. फुफ्फुसे हे गळ्याच्या खालच्या भागापासून डायफ्राम पर्यंत पसरलेले असतात. यांचा वरचा भाग क्लावी कुलर अस्थींच्या वर असतो व खालचा भाग डायग्राम वर स्थित राहतो.

पाचव्या ते सातव्या वक्षस्थळाच्या मणक्यांच्या स्तरावरील त्रिकोणी क्षेत्र हायलम (एडेमा) सह त्यांच्यात एक मध्यवर्ती (वाकलेली) पृष्ठभाग थोडीशी बुडलेली–सी (अंतर्गोल) आहे. फुफ्फुसीय धमनी, फुफ्फुसे रक्तवाहिन्या, फुफ्फुसाच्या नसा आणि लसीका वाहिन्या फुफ्फुसांमध्ये हायलममार्गे प्रवेश करतात. फुफ्फुसांच्या डायफ्रामवर राहणाऱ्या पृष्ठभागाला डायफ्रामॅटिक पृष्ठभाग म्हणतात. फुफ्फुसातील अग्र किनाराहृदयाचा अग्र भागाला झाकून ठेवतो. आणि पृष्ठभागाचा किंवा पार्श्वभागाचा किनारा कशेरुकाच्या स्तंभाच्या संपर्कात राहतो.

प्रत्येक फुफ्फुसांना खोल विच्छेदनाद्वारे विभागांमध्ये (lobes) मध्ये विभागले जाते. डाव्या फुफ्फुसात दोन विभाग आहेत, जे तिरपे विच्छेदन करून विभक्त आहेत. वरचा विभाग खालच्या भागाच्या वर आणि पुढे राहतो. खालचा विभाग शंकूच्या आकाराचा आहे. उजव्या फुफ्फुसात तीन विभाग आहेत. त्याचा खालचा विभाग तिरकस विच्छेदन करून वरच्या आणि मध्यम विभागात विभागला आहे आणि उर्वरित भाग तिरकस विच्छेदन करून विभागला आहे; त्यानंतर प्रत्येक विभाग लहान विभागांमध्ये विभागला जातो, ज्याला ब्रँको–पल्मोनरी विभाग म्हणतात. हे विभाग एकमेकांशी कनेक्टिव्ह टिश्यू भिंतीद्वारे विभक्त असतात. आणि प्रत्येकास धमनी आणि रक्तवाहिनी असते. प्रत्येक लहान विभाग अनेक युनिट्समध्ये विभागलेला असतो, ज्यास खांडक किंवा लोब्यूल म्हणतात.

या ब्लॉक्समध्ये श्वसनिका आणि हवेच्या थैल्या (वायुकोष) भरलेले असतात. असंख्य प्रमाणात विद्यमान एअर थैली (वायुकोष) फुफ्फुसातील श्वसन भाग आहेत. श्वासोच्छवासामुळे शोषलेली वायु श्वसनमार्गाद्वारे वायुकोषांपर्यंत पोहोचते, जिथे त्यांच्यामध्ये आणि पेशींच्या भिंती दरम्यान वायूंचे आदानप्रदान केले जाते.

फुफुसावरण किंवा प्लुरा –

फुफुसावरण (प्लुरा) एक डबल लेयर membrane (पातळ पडदा) आहे, ज्याने प्रत्येक फुफुसाला घेरलेले असते. त्याचा एक थर किंवा अंतरांगी फुफुसावरण फुफ्फुसांच्या अगदी जवळ असते आणि फुफ्फुसात प्रवेश करते. फुफ्फुसांच्या खालच्या भागापर्यंत पोहोचल्यानंतर, ते (व्हिसरल प्ल्यूरा) मध्ये परावर्तीत होते आणि दुसरा स्तर 'पार्श्विक फुफुसावरण' बनवते; जो भाग फासळ्या व्यापतात त्याला 'कॅस्टल प्लुरा' म्हणतात, गळ्याला लागून असलेल्या भागाला 'सर्वाइकल प्लुरा' म्हणतात आणि मेडियाइनिअमला व्यापणार्याच भागाला मेडिआस्टाइनल प्लुरा असे म्हणतात.

फुफ्फुस किंवा फुफ्फुसाच्या दोन थरांमधील भागाला 'फुफ्फुस पोकळी' म्हणतात; हे थोडे पातळ सिरेमिक फ्लुईड ने भरलेले आहे, जे प्लुराच्या पृष्ठभागावर वंगण घालते, म्हणजे त्यांना ओलसर आणि गुळगुळीत ठेवते. सामान्यतप्लुराचे दोन्ही स्तर एकमेकांशी संपर्कात असतात, परंतु श्वसोच्छ्वासाच्या दरम्यान त्यांच्यात द्रवपदार्थांची उपस्थिती एकमेकांवर घर्षण न होता घासल्या जाते आणि बाह्य धक्क्यापासून देखील संरक्षित राहते. प्लूरिसी

नावाच्या रोगामध्ये हे फुफुसावरणसूजते ज्यामुळे सिरेमिक फ्लुइड, ज्याला फुफ्फुस द्रव म्हणून देखील ओळखले जाते, मोठ्या प्रमाणात वाढते आणि प्लूरल गुहा अधिक वाढते.

फुफ्फुसांना रक्तपुरवठा –

फुफ्फुसीय किंवा पल्मोनरी धमनी हृदयाच्या उजव्या वेंट्रिकलमधून अपवित्र रक्त फुफुसांमध्ये आणते; येथे दोन शाखांमध्ये विभागून bronchus सोबत पुढे वहन करते. त्यानंतर श्वसनिका Bronchiole सोबत पुढे जाऊन असंख्य सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म धमन्यांमध्ये विभागली जाते, आणि शेवटी एअर थैल्याच्या भिंतीभोवती (वायुकोषांभोवती) पेशींचे दाट जाळे तयार करते. हवेच्या थैल्या आणि पेशी संमिश्र आणि चिकट असतात. म्हणून, ऑक्सिजन आणि कार्बन डाय ऑक्साईड वायू त्यांच्या आरपार वहनामध्ये यशस्वी होतात. वायूंची देवाणघेवाण करण्याची ही क्रिया प्रसारणाच्या शारीरिक नियमांवर आधारित आहे. येथे लाल रक्तपेशींचे हिमोग्लोबिन, ऑक्सिजन ग्रहण करते आणि कार्बन डाय ऑक्साईड रक्तातून बाहेर पडते. अनेक शिरा एकत्र करून मोठ्या नसा तयार करतात आणि शेवटी प्रत्येक फुफ्फुसातील दोन फुफ्फुसाच्या नसा – पल्मोनरी Veins बनतात.

या फुफ्फुस रक्तवाहिन्या फुफ्फुसांच्या हायलममधून जातात आणि शुद्ध (ऑक्सिजन–समृद्ध) रक्त हृदयाच्या डाव्या भागापर्यंत पोहोचवतात; जिथून रक्त व्हेन्ट्रिकल मध्ये जाते व येथून महाधमनी आणि तिच्या शाखांद्वारा संपूर्ण शरीर भर प्रवाहित केले जाते.

श्वसनाच्या पेशी –

प्रश्वसन दरम्यान थोरॅसिकचा विस्तार ऐच्छिक आणि अनैच्छिक स्नायूंच्या मिश्रित लवचिकतेचा परिणाम म्हणून होतो. सामान्य श्वसन क्रियेत इंटरकोस्टलस्नायू आणि मध्यच्छद्र पेशी (diaphragm) हे मुख्य श्वसन स्नायू असतात. मान, खांदा आणि ओटीपोटात स्नायू देखील सखोल श्वसनक्रिये दरम्यानभाग घेतात.

इंटरकोस्टल स्नायू –

इंटरकोस्टल स्नायूंच्या ११ जोड्या आहेत, ज्यांनी १२ जोड़ी फासळ्यांना मध्य भागातून घेरलेले असते. बाह्य आणि अंतर्गत इंटरकोस्टल स्नायू म्हणून ते दोन थरांमध्ये स्थित असतात.

मध्यच्छद पेशी (Diaphragm)

हे वक्षीय आणि उदरीय भागाला विभाजीत करणारे, अर्ध गोलाकार आकृतिचे एक पातळ पेशिंचे आवरण असते. याचे मधले आवरण हे फुफुसांच्या दिशेने तर बाजूचे आवरण हे खालच्या दिशेने असते. याच्या पेशी विकेन्द्रित होऊन फासळ्यांना तसेच sternum आणि vertebral column ला जूळलेले असते.

श्वसन प्रणालीची पद्धत –

श्वासोच्छवास क्रिया दोन भागांमध्ये आहे – प्रश्वसन (Inspiration) आणि नि:श्वसन (Expiration)

प्रश्वसन – या दरम्यान, इंटरकोस्टल स्नायू आणि डायाफ्राम दोन्ही मज्जातंतूद्वारे एकाच वेळी उत्तेजित होतात, ज्यायोगे वक्षस्थळाच्या पोकळीचे प्रमाण वाढते आणि फुफ्फुसे ही वाढलेली जागा भरण्यासाठी विस्तृत होतात. त्यांच्या विस्तारामुळे, वायुमार्ग आणि वायुमार्गातील दाब (म्हणजे फुफ्फुसातील हवा) बाह्य वायुमंडलीय हवेच्या दाबाने कमी होते, ज्यामुळे बाह्य वायुमंडलीय वायु वायुमार्गाद्वारे वायुमार्गात ओढले जाते. या क्रियेला प्रश्वसन'असे म्हणतात, कारण याद्वारे बाह्य हवा फुफ्फुसांमध्ये ओढली जाते.

नि:श्वसन – इंटरकोस्टल स्नायू आणि डायाफ्राम या दरम्यान दोन्ही शिथिल होतात. त्यांच्या विश्रांतीमुळे, वक्षस्थळावरील पोकळी अरुंद होते, ज्यामुळे फुफ्फुसांवर दबाव निर्माण होतो आणि फुफ्फुसांच्या आत कार्बन डाय ऑक्साईड असलेली हवा श्वसनमार्गाद्वारे बाहेर पडते. हवेच्या बाहेर जाण्याला नि:श्वसन असे म्हणतात.

वरील दोन्ही क्रियांचा क्रम म्हणजे प्रश्वसन आणि नि:श्वसन आयुष्यभर सुरु असते. ही एक उत्स्फूर्त क्रिया

आहे, ज्यामुळे प्रत्येक श्वासोच्छवासाने हवा आत येणे व बाहर जाणे निरंतर सुरु असते.

गॅसियस एक्सचेंज (गैसीय विनिमय);

गैसीय विनिमय (Gaseous exchange) – शरीराच्या आत मध्ये गॅस म्हणजे वायू यांचे आदान–प्रदान हे फुफुसांमध्ये असलेल्या वायुकोश आणि आणि याच्या चारही बाजूला असलेल्या रक्त कोशिकांमध्ये होत असते. ज्याला बाह्य श्वसन (external respiration) म्हणतात. तसेच रक्त कोशिका आणि शरीराच्या उतक कोशिका यांच्यामध्ये देखिल होते, ज्याला आंतरिक श्वसन (internal respiration) म्हणतात.

श्वास घेतलेल्या वायुसह हवेमध्ये अनेक वायू आहेत, ज्याची रचना खालीलप्रमाणे आहेः

नायट्रोजन – ७९ टक्के

ऑक्सिजन – २१टक्के

कार्बन डाय ऑक्साईड – ०.०४ टक्के

पाण्याची वाफ आणि इतर वायू फारच कमी प्रमाणात असतात.

बाह्य श्वसन किंवा फुफ्फुसीय श्वसन –

जेव्हा प्रसारित हवा एअर पिशव्यापर्यंत पोहोचते तेव्हा ते वायु थैलीच्या सभोवताल असलेल्या, फुफ्फुसीय धमन्यांच्या सेल्युलर प्लेक्ससमध्ये असलेल्या, रक्ताच्या जवळच्या संपर्कात राहते. १०० मिमी पाराच्या दाबाने हवेमध्ये ४० मिमी ऑक्सिजन उपस्थित असतो. त्यापलीकडे असलेल्या दबावामुळे शिरासंबंधी रक्त त्यामध्ये असलेल्या ऑक्सिजनच्या संपर्कात येते. त्यामुळे दोन्ही दाब समान होईपर्यंत, वायू रक्तात मिसळत राहतो. त्याच वेळी रक्तामध्ये उपस्थित कार्बन डाय ऑक्साईड ४० मिमी पाराच्या दाबाने दडपणाखाली येतो आणि वायू रक्ताच्या बाहेर हवेच्या थैलीमध्ये पसरतो. अशाप्रकारे बाहेर टाकलेल्या वायूची रचना बदलली जाते, म्हणजे त्यामध्ये ऑक्सिजन कमी आणि कार्बन डाय ऑक्साईड जास्त असते. नायट्रोजन कमी आणि कार्बन डाय ऑक्साईड जास्त आहे. नायट्रोजनचे प्रमाण समान असते.

हद्दपार केलेल्या हवेची रचना खालीलप्रमाणे आहे.

नायट्रोजन – ७९ टक्के

ऑक्सिजन – १६ टक्के

कार्बन डाय ऑक्साईड – ४.५ टक्के

आंतरिक किंवा कोशिकीय श्वसन (Internal or cellular respiration) –

बाह्य श्वसनात वायु कोशांमध्ये असलेला ऑक्सिजन विसरण द्वारा धमन्यांच्या कोशिकातील रक्तामध्ये मिसळते. काही ऑक्सिजन रक्त प्लाजमा मध्ये मिसळते तसेच उरलेले हिमोग्लोबिनशी संयुक्त होते ज्याला ऑक्सीहिमोग्लोबिन म्हणतात.

हे रक्त शुद्ध मानले जाते. शुद्ध रक्त पल्मोनरी शिरा द्वारे हृदयाच्या डाव्या भागात पोहोचते, आणि डाव्या निलय मध्ये पोहोचून महाधमनी आणि त्यांच्या शाखांमधून संपूर्ण शरीरात पसरते. शरीराची उतक कोशिका आणि धमनी रक्त कोशिकांमध्ये ऑक्सिजनचा दाब कमी असतो. ज्यामुळे विसरण द्वारा रक्ताची ऑक्सिजन कोशिका च्या रक्तामधील गॅसचे आदान–प्रदान होते. इथे ऊतक कोशिकांमध्ये ऑक्सिजनचा दाब कमी असतो. विसरण द्वारा रक्तातील ऑक्सिजन कोशिकांच्या भिंती पार करून उतक कोशिकांमध्ये जातात. याची मात्रा ऊतकांच्या सक्रियतेवर निर्भर करते. याच वेळी उत्तकांमध्ये निर्माण झालेला कार्बन–डाय–ऑक्साईड विसरण द्वारा कोशिकांच्या मध्ये गॅसचे आदान–प्रदान अर्थात आंतरिक श्वसन होते . या कोशिकांच्या कार्बन–डाय–ऑक्सावईड युक्त अर्थात अशुद्ध रक्त क्रमशः मोठ्या शिरांमध्ये येते शेवटी ऊर्ध्व एवम महाशिरांद्वारे हृदयाच्या उजव्या भागात पोहोचते.

श्वसन दर (the rate of respiration) –

सामान्य श्वसन मध्ये प्रश्वसन नंतर लगेच निश्वसन होते. त्यानंतर पुन्हा प्रश्वसन होण्याच्या आधी काही क्षणांचा विराम असतो. या प्रकारे प्रश्वसन आणि निश्वसन तसेच विराम काळ तिन्ही द्वारा श्वसन चे एक चक्र बनते. एका मिनिटात जितके श्वसन चक्र पूर्ण होतात तेच श्वसन दर असतात.

वयस्कर व्यक्तींमध्ये विश्रमाच्या वेळी श्वसन दर एका मिनिटात १६ ते २३ वेळा असतो. लहान मुलांचे श्वसन दर प्रति मिनिट २५ ते ४० असतात. स्त्रियांमध्ये पुरुषांच्या तुलनेने श्वसन दर अधिक असते. परिश्रमाच्या वेळी श्वसन दर वाढते.

सामान्यतः श्वसनक्रियेचे दर शरीराच्या ऑक्सीजन संबंधी आवश्यकतानुसार कमी अधिक असते. शारीरिक श्रमाच्या वेळी श्वसन दर वाढणे हे एक कारण आहे. कारण यावेळी कोशिकांमध्ये अधिक ऊर्जेसाठी जास्त मात्रेत ऑक्सिजनची आवश्यकता पडते. ऑक्सिजनची आवश्यकता कमी झाल्यावर (विश्रांतीच्या वेळी) हा दर पुन्हा सामान्य होतो.

श्वसनाचे नियंत्रण (Control of respiration)

श्वसन क्रिया चे नियंत्रण पुढील दोन पद्धतीने होते –

मानव जीव विज्ञान व योग:

तांत्रिकी नियंत्रण (nervous control) मेंदूच्या मेडू ला अभंग मध्ये स्थित असलेल्या श्वसन केंद्रा (respiratory Centre) द्वारे श्वसन क्रिया नियमित व नियंत्रित केली जाते. श्वसन केंद्राचे प्रश्वास (inspiratory) आणि निश्वास (expiratory) असे दोन भाग असतात जे क्रमशः श्वास घेणे व श्वास सोडणे यांच्याशी संबंधित आहे. पोन्स मध्ये स्थित न्यूमोटेकटॅक्सीक केंद्र सुद्धा निश्वास मध्ये भाग घेतो. जेव्हा प्रश्वास केंद्र जागृत होतो तेव्हा त्यांन संवेदना उठतात व त्या स्पायनल कॉर्ड मध्ये पोहोचतात व तिथून इंटर कोस्टल आणि फ्रेनिक तंत्रिका द्वारे क्रमशः इंटर कोस्टल पेशी आणि फ्रेनिक तांत्रिका द्वारे क्रमशः इंटर कोस्टल पेशी व श्वासपटल मध्ये पोहोचतात. या संवेदना मुळे इंटर कोस्टल पेशी तथा श्वासपटल संकुचित होतात व वायू कोशाचे (alveoli) आकारमान वाढते त्यामुळे वायुकोशात असलेल्या वायूचा दाब हा बाहेरील वातावरणातील वायूच्या दाबापेक्षा कमी होतो ज्यामुळे बाहेरील वातावरणातील वायू फुप्फुसांमध्ये घेतली जाते व अशाप्रकारे प्रश्वास संपन्न होतो म्हणजेच श्वास घेतला जातो. प्रश्वास ही प्रक्रिया घडल्यावर फुफ्फुसातील वायुकोश वायूने भरून जातात व त्यामुळे फुफ्फुसे फुलतात फुफ्फुसांच्या फुल यामुळे यामुळे संवेदनशील तांत्रिका ची टोके (nerve endings) जागृत होतात. संवेदनशील तांत्रिका जागृत झाल्यामुळे अभिवाही संवेदना (afferent impulses) उत्पन्न होतात. अभी वाही संवेदना वेगस तांत्रिका (Vagus nerve) द्वारे मेडूला लंगोटा च्या निश्वास केंद्र तथा पोन्स च्या न्यूमोटॅक्सिस केंद्र मध्ये पोहोचतात जिथून अपवाही तांत्रिका (efferent impulses) च्या संवेदना प्रश्न वास केंद्रातील पेशींपर्यंत पोहोचतात त्यामुळे त्या पेशी शिथिल होतात. प्रश्वास केंद्रातील पेशी शिथिल झाल्यामुळे वायु कोशाचा आकारमान कमी होतो व फुफ्फुसे आकुंचित होतात. त्यामुळे फुफ्फुसातील वायू शरीराबाहेर फेकली जाते अशाप्रकारे निश्वास ही प्रक्रिया संपन्न होते म्हणजेच श्वास सोडला जातो.

रासायनिक नियंत्रण (Chemical control) -

मानवी रक्तात कार्बन डाय ऑक्साइड चा प्रभावशाली परंतु अप्रत्यक्ष प्रभाव होतो. कार्बन डाय–ऑक्साइड पाण्यासोबत मिसळून कार्बनिक एसिड बनवतो, जो बायकार्बोनेट आयन आणि हायड्रोजन आयन मध्ये विभागले जातात. जर कार्बन–डाय–ऑक्सासईड ची सांद्रता (concentration) सामान्य स्थळ पेक्षा जास्त झाली तर हायड्रोजन आयन ची सांद्रता वाढते म्हणजेच पीएच लेव्हल (pH level) कमी होते. कमी झालेल्या पीएच मुळे मेंदूतील श्वसन केंद्र प्रभावित होतो ज्यामुळे श्वसनाचा दर वाढतो. रक्तातील पीएच कमी झाल्याची संवेदना महाधमनी (Aorta)

आणि कॅरोटीड मध्ये स्थित असलेल्या कॅरोटीड (carotid bodies) आणि महाधमनी बोडीज (aortic bodies) मध्ये स्थित असलेल्या रसायन ग्रंथी (Chemoreceptors) मुळेही ओळखल्या जाते. या रसायन ग्रंथीमध्ये उत्पन्न झालेले तांत्रिक आवेग मेंदूतील श्वसन केंद्रात पोहोचतात. रक्तातील कार्बन डाय-ऑक्साइड वाढल्यामुळे रासायन ग्रंथी व श्वसन केंद्र दोघेही जागृत होतात आणि याचाच परिणाम म्हणजे प्रश्वास (inspiration) ही क्रिया घडते. प्रश्वास हि क्रिया घडत असताना लंग्स फुलतात व त्यामुळे वेगस तांत्रिका जागृत होतात. रसायन ग्रंथी मध्ये उत्पन्न झालेले उत्तेजन वेगस तांत्रिक के द्वारे श्वसन केंद्र कडे पोहोचविले जातात ज्यामुळे प्रश्वास ही प्रक्रिया थांबवली जाते आणि याचेच फलस्वरूप म्हणजे निश्वास ही प्रक्रिया घडते. निश्वास ही क्रिया घडत असताना शरीरातील अधिक कार्बन डाय-ऑक्साइड शरीराच्या बाहेर फेकल्या जातो आणि रक्तात कार्बन-डाय-ऑक्साइडचे सांद्रता कमी होते. रक्तात पर्याप्त कार्बन-डाय-ऑक्सातईड ची मात्रा जमल्यास पुनः प्रश्वास ही प्रक्रिया घडते. अशाप्रकारे श्वसन ही प्रक्रिया स्वतः नियमितपणे (Auto-regulated) चालू राहते.

५.५ सारांश –

प्रिय विद्यार्थ्यांनो, वरील विवेचनावरून तुम्ही श्वसन संस्थेची संरचना तसेच कार्ये यांच्याशी परिचित झाले असाल. विद्यार्थ्यांनो, जसे रक्ताभिसरण संस्था शरीरामध्ये रक्त पोहचविण्याचे कार्य करते, तसेच हि श्वसनसंस्था शरीराच्या विभिन्न अंगांना ऑक्सिजन पोहचविण्याचे कार्य करतात. या कार्यामध्ये, अनेक अंगांचा सहभाग असतो जसे, नाक, ग्रसनी, स्वरयंत्र, ट्रॅकिया, श्वासनलिका, वायुकोष फुस्फुसे. श्वसनाच्या एका प्रक्रियेमध्ये एक वेळा श्वास आत घेणे आणि बाहेर सोडणे, दोन्ही सामावलेले असते, ज्यांना क्रमशः प्रश्वसन किंवा निःश्वसन म्हंटले जाते. जर का प्राण्यांची श्वसन संस्था ठिक प्रकाराने कार्य करीत नसेल, तर तो प्राणी जीवित राहू शकत नाही. त्यामुळे स्पष्ट आहे की, जीवनासाठी श्वसन संस्थाचे उत्तम प्रकारे कार्य करने अत्यावश्यक आहे.

५.६ शब्दावली –

प्रश्वसन – श्वास आतमध्ये घेणे.
निःश्वसन – श्वास बाहेर सोडणे.
नासा – नाक नलिका.
फ्रन्टल – पुढचे किंवा समोरचे.
श्रवणीय – ऐकणारी.
नासारंध्र – नाकाचे छिद्र.

५.७ अभ्यास प्रश्नांची उत्तरे –

१) प्रश्वसन २) निःश्वसन ३) दोन ४) उजवे निलय ५) ऑक्सिजन हिमोग्लोबीन

५.८ संदर्भ ग्रंथ सूची –

४. गुप्ता, पो. अनंत प्रकाश (२००८) मानव शरीर रचना व क्रिया विज्ञान सुमित प्रकाशन, आगरा.
५. गौढ, शिवकुमार (१९७६) अभिनव शरीर क्रिया विज्ञान, नाथ पुस्तक भंडार, रेल्वे रोड रोहतक.
६. शर्मा डा. तारा चंद्र (१९७९) आर्युर्वेदिय शरीर रचना विज्ञान, नाथ पुस्तक भंडार, रेल्वे रोड, रोहतक.
७. पाण्डे डा. के.के. (२००३) रचना शरीर चौखंबा कृष्णदास अकादमी, वाराणसी.

५.९ निबंधात्मक प्रश्न –

प्रश्न १ – श्वसन संस्थेचा सामान्य परिचय देऊन त्याची संरचना व कार्ये यांचे वर्णन करा?

Unit-III

प्रकरण – ६
पचनसंस्थेची संरचना व कार्य

६.१ प्रस्तावना

मनुष्य शरीराला विभिन्न आंतरिक तसेच बाह्य कार्य करण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते जी हे शरीर आहाराद्वारे ग्रहण करते परंतु जो आहार शरीराद्वारे ग्रहण केला जातो तो त्याच स्वरूपात शरीराला उपयोगी नसतो, म्हणुन त्याला शरीरानुकुल बनवण्यासाठी त्यात काही परिवर्तन करावे लागते.

त्या सर्व भौतिक तसेच रासायनिक परिवर्तन (क्रिया) ज्याच्या फलस्वरूप आहार शरीराद्वारे ग्रहण करण्यायोग्य बनवला जाते, तयार केले जाते त्या क्रियेला पचन (Digestion) म्हटले जाते, जे–जे अंग या क्रियेत भाग घेताता त्यांना पाचन अंग (Digestive organ) तसेच ज्या संस्थे अंतर्गत ह्या सर्व क्रिया होतात तीला पचन संस्था (Digestive system) म्हटले जाते. या संसारात (जगात) वेग–वेगळ्या जीवांमध्ये त्यांच्या (भोजनावर) भोजन पद्धतीवर आधारित पचन तंत्र बघायला मिळते. शाकाहारी जीवांच्या भोजनाचे मुख्य द्रव्य कार्बेदके आहे ज्याचे पचन एवं शोषण आतड्यांमध्ये होते त्यामुळे या जीवांचे आतडे लांब (शरीराच्या प्रमाणात ९ ते १० पर मोठी) असते. मासांहारी जीवांमध्ये भोजानाचे मुख्य द्रव्य प्रथिने असते, ज्याचे पचन आमाशयात होते, ह्या जीवांचे आमाशय मोठे आणि लांब असते आणि आतडे छोटे (शरीराच्या प्रमाणात उपर मोठी) बघायला मिळतात. मनुष्य हा एक सर्वाहारी जीव आहे. ज्यात आमाशयाचा आकार तथा आतड्यांची लांबी मध्यम, शरीराच्या प्रमाणात पात ते सहा पट मोठी बघायला मिळते या प्रकरणात मनुष्याच्या पचन तंत्राची संरचना आणि कार्यविधिचे वर्णन केले गेले आहे.

६.२ उद्देश्य

वरील प्रकरणाच्या अध्ययना नंतर तुम्ही

- पचन तंत्राला समजु शकाल
- विविध पचन अंगांना तसेच पचन क्रिया सांगु शकता.
- पाचक रसांची क्रियाविधी समजु शकतात.

६.३ पचन (प्रणालीची) संरचना

मनुष्यामध्ये पचन क्रियेची सुरूवात दात तथा जीभेपासुन होते जी कंढ नलीका, आमाशय, लहान आतडे आणि मोठे आतड्याचा अंतिम भाग गुदा पर्यंत पसरलेली असते. या पूर्ण रचनेची लांबी जवळजवळ ३० फीट आहे. ज्याचे विस्तृत वर्णन या प्रकारे आहे -

६.३.१ दात आणि जीभ

बाल्यावस्थे मध्ये दातांची संख्या २० असते आणि मोठे होईपर्यंत ती ३२ होते. आपल्या तोंडाचा खालच्या दाताचा जबडा ईकडे-तिकडे हलु शकतो. दाताच्या वर आपल्या शरीराचा सर्वांत कठेर पदार्थ इनेमल चा लेप चढवलेला असतो. दात स्वच्छ न करणे तथा नुकीले, तेज पदार्थाचा दातावर प्रयोग करण्याने हा इनेमल चा स्तर दातावरून निघून जातो ज्यामुळे थंड-गरम पाणी लागणे आणि दातांमध्ये दुखणे सुरू होते.

जीभ पचनामधला एक महत्वपूर्ण भाग आहे. ही स्वाद कळण्याबरोबरच अजुनही बरेच महत्वपूर्ण कार्य करते, जसे -

- ही तोंडामध्ये (मुखामध्ये) भोजनाला चालवण्याचे काम करते.
- भोजनाला चावण्याच्या हेतुने दातांमध्ये अन्नाला घेवून जाते.
- दातांना स्वच्छ ठेवण्याचे काम करते.
- अन्न बारीक झाल्यावर ते गिळायला मदत करते.
- तोंडात स्थित असणाऱ्या लाळ ग्रंथी अन्नामध्ये मिसळून त्याला ओले करते गिळण्या योग्य बनवते लाळ ग्रंथी प्रतिदीन १ ते १.५ लीटर लाळेचे स्त्रावण करते.

६.३.२ कंठनलीका किंवा अन्ननलिका

मुखापासुन आमाशयापर्यंत दहा इंच लांब, एक इंच व्यास अशी रचना असलेली अन्ननलिका मांस पेशीने तयार झालेली असते. अन्ननलिकेच्या मुखाशी एक झाकण असते, ज्यावेळी अन्न मुखातून छिद्रामध्ये प्रवेश करते. त्यावेळी श्वास मार्गाला बंद करते ज्यामुळे अन्न श्वास नलीकेत न जाता सरळ अन्ननलिकेत जाते.

६.३.३ आमाशय

हे डाव्या बटगड्याच्या खाली नऊ इंच लांब एका पिशविच्या आकारप्रमाणे आगाशयाची रचना आहे ज्याची सामान्य क्षमता एक ते दीड लीटर अन्न सामग्री ग्रहण करण्याची असते. ह्याच्या आतमध्ये वास्तविक रिकामे स्थान (जागा) नसते, आणि सामान्य अवस्थेमध्ये भोजनाने रिकामे झाल्यावर ह्याच्या दोन्ही भिंती एकमेकांना चिकटून राहतात ज्या अन्न आल्यावर प्रसरण पावतात. आमाशयात जेवण चार ते पाच तासांपर्यंत थांबते तेथे (म्यूकस) श्लेष्म तयार करणाची गोबलेट सेल्स (पेशी) उपस्थित असतात.

आमाशयामध्ये अन्नाचे काही अशी पचन होवून जाते तथा लगदयाच्या स्वरूपात हे छोट्या आतड्यामध्ये फेकले जाते आणि काही तासातच आमाशय रिकामे होते तेव्हा तेथील रिक्तपणा मुळे आपल्याला भुक लागल्याची अनुभूती होते.

६.३.४ लहान आतडे

मोठ्या आतड्याच्या तुलनेत परिघाने छोटी असल्यामुळे ह्याला लहान आतडे म्हटले जाते ज्याचे तीन असतात. प्रारंभिक भाग इंग्रजी 'C' च्या आकाराची असतो, ज्याला डूर्डिनम (पक्वाशय) म्हटले जाते. त्यापुढील

भाग इलियम आणि जेजुनम आहे. ह्यात डूर्डिनम (पक्वाशय) पचनाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण भाग आहे, येथेच यकृतातुन येणारे पित्त आणि स्वादुपिंडातुन येणारा पेन्क्रियेटिक स्त्राव पडतो. ह्या स्त्रावांद्वारेच प्रथिने, स्निग्ध पदार्थ एवं कार्बोज चे पचन होते. भोजनाला आवश्यक तत्व निर्माण करणे पक्वाशयाच्या पचनक्रियेचे स्वरूप आहे. येथे लक्ष देण्यासारखी गेष्ट आहे की, जेवणात अत्यंत तीष्ण आम्ल पदार्थ अग्नाशय आणि यकृत पित्त रसाच्या क्षाराने देखील निष्प्रभावी झाले नाही तर पक्वशयाच्या पडदयावर घातक प्रभाव टाकून जखम तयार करते. ज्याला अल्सर म्हटले जाते. लहान आतड्याचे अंतिम टोक मोठ्या आतड्यात स्थित आंत्रपुच्छाला मिळते.

लहान आतडे पचन आणि शोषणच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे कारण येथुनच भोजनाचे पचन आणि शोषणच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे कारण येथुनच भोजनाचे पचन आणि शोषण होते आणि गती प्राप्त होते ज्यामध्ये आतड्यांच अकुंचन आणि प्रसरण महत्वाचे आहे. येथे एक टॉवेल च्या दोराच्या समान अकाराची एक विशिष्ट रचना असलेली विलाई उपस्थित असते ज्याची संख्या लाखो मध्ये असते. ही आतड्याच्या पृष्ठभागाला मोठ्या प्रमाणात वाढवते ज्याद्वारे आहाराचे शोषण होते.

६.३.५ मोठे आतडे

ह्यालाच ठसे कोलोन असे म्हटले जाते. हे जवळजवळ दोन मीटर लांब असते. मोठ आतडे पहिले वर जाते मग जमिनीला समांतर होते आणि मग खाली येते.

मोठ्या आतड्याच्या पहिल्या भागाला सीकम म्हटले जाते. हे छोट्या आतड्याशी जुळलेले असते. ज्याच्या खाली बोटाच्या आकारासारखी रचना असते तिला आतपुच्छ (एपेन्डिक्स) म्हटले जाते. हे आतड्यात होणाऱ्या संसर्गाला रोखण्याचे काम करते परंतु काही वेळा ह्यातही संसर्ग होतो ज्यामुळे तीव्र वेदना होते ज्याला एपैन्डिक्स चा त्रास होणे म्हटले जाते, ज्यावेळी ऑपरेशन करून ते काढले जाते. मोठ्या आतड्यावरच आमाशय असते. ह्याच कारणामुळे काही लोकांना जेवणानंतर लगेचच मल विसर्जनाची इच्छा होते. कारण भोजन झाल्यावर आमाशयावर दाबाव पडतो आणि मोठे आतडे गतिशील असलयाने मल विसर्जनाची इच्छा होते.

मोठ्या आतड्याच्या अंतिम भागाला मलाशय म्हटले जाते. ज्यात आहाराचे शेष भाग एकत्र हातो आणि मल त्याग्याच्या वेळी बाहेर जातो.

मोठ्या आतड्यात पचनाचे विशेष कार्य होत नाही. येथे मुख्य प्रमाणात पाण्याचे शोषणाचे कार्य होते. ज्यामुळे मलाचा द्रव भाग कमी हातो आणि मल एक ठोस आकार घेते. येथे मल बराच काळ (साठून) पडून राहते, त्यामुळे आहाराच्या अपचित अंशावर देखील स्थित जिवाणुंद्वारा क्रिया येथेच होते. ज्याचे परिणामस्वरूप अनेक विषारी गैस जसे सल्फाइड डाई आक्साइड, कार्बन डाई ऑक्साइड, अमोनिया आदि तयार होतात. हे गॅस आतड्यात जाऊन विकार उत्पन्न करतात. तसेच शेषित होवून रक्तात देखील पोहोचतात आणि शरीरात रोग उत्पन्न करतात.

याव्यतिरिक्त आतड्यातील जीवाणु काही लाभदायक पदार्थांना देखील निर्माण करतात, ज्यामध्ये विटॉमिन बी मुख्य आहे. त्यामुळे नेहमी-नेहमी विरेचक पदार्थांचा प्रयोग करू नये कारण त्यामुळे आतंड्यात स्थित जिवाणु नष्ट होतात ज्यात विटॅमीन ची उत्पत्ति कमी होते आणि त्यांच्या कमतरतेमुळे रोग उत्पन्न होतात.

६.४ भोजन पचनाची क्रियाविधि

आहाराचे पचन तीन स्थानांवर होते - तोंडात (मुखात), आमाशय आणि लहान आतड्यामध्ये. प्रत्येक स्थानावर आहाराच्या विविध अंशाचे पचन होते.

६.४.१ मुखातील पचन

अनन सर्व प्रथम मुखामध्ये चावले जाते. ह्या क्रियेमध्ये मुखातील लाळ ग्रंथीद्वारे तयार होणारी लाळ अन्नात मिसळली जाते. त्याच वेळी जीभेवर स्थित स्वाद कलिका स्वाद ग्रहण करते. त्याचवेळी अन्नाचे ठोस रूप येथेच नष्ट होते, आणि आहार गिळण्यायोग्य होते. या अवस्थेत लाळेत आढळणारे टायलिन नामक एन्जाइम कार्बोदकांवर

क्रिया करून त्याला सरळ रूपात बदलून टाकतात. हेच कारण आहे की, जर अननाल अधिक वेळ चावले. तर ते गोड लागयला सुरूवात होते मुखामध्ये काबंदकाचे काही प्रमाणात पचन होते.

६.४.२ आमाशयातील पचन

आमाशयात आहाराचे पचन आमाशयिक रसा द्वारे होते. हा रस म्हणजे अनेक पदार्थाचे मिळते. जुळते रूप आहे. यात आमाशय आक्सेन्टिक पेशी द्वारे निर्माण होणारे हाइड्रोक्लोरिक अम्ल तथा एन्जाइम उपस्थित असतात. एसिडच्या उपस्थिती मुळे, अन्न येथे येवुन अम्लीय स्वभावाचे होते, आमाशयात स्थित श्लेष्म (म्यूकस) आमाशयाच्या भिंतीवर एक पातळ आवरण टिकवून ठेवते, ज्यामुळे आमाशयात स्थित एसिड आमाशय च्या भिर्तीना हानी पोहोचवत नाही.

आमाशयात उत्पन्न होणाऱ्या एसिड चे एक काम हे आहे की, जेवणातील आलेल्या जीवाणुंना नष्ट करतात आणि सोबतच अन्नाला पचवण्यात महत्वपुर्ण भुमिका निभावतात. ह्यातच प्रथिनांना पचवणांच्या एन्जाइम पेप्सिन आढळते. हे पेप्सिन एन्जाइम हाइड्रोक्लोरिक आम्लासोबत मिळून एक तेज मिश्रण तयार करते. जे की प्रथिनावर क्रिया करून त्यांना पेप्टोन्स मध्ये बदलते. ह्याप्रकारे आमाशयात प्रथिनाचे पाचन होते. येथेच एक दुसरो पन्जाइम रेनिन मिल्क प्रथिनांना पचवते. ते कैल्शीयम मध्ये मिसळुन कैशिनेट तयार करते, याच ठिकाणी सिति पेप्सिन नामक एन्जाइमला थोड्या मात्रेमध्ये पचवले जाते. हे फॅट ला फॅटी एसिड मध्ये रूपांतरित करते. त्यानंतर येथून आहार छोट्या आतड्याकडे पाठवला जातो जेथे अन्नाचे पूर्ण पचन आणि शोषण होते.

६.४.३ लहान आतड्यातील पचन

लहान आतड्यांत ह्या आहारात/अन्नात तीन स्त्रव मिसळले जातात.

अ) यकृतातुन निघणारा स्त्राव - पित्तरस

ब) अग्नाशयातुन निघणारा स्त्राव - आग्नाशयिक रस

क) पाचक स्त्राव (एन्जाइमस)

अ) पहिला स्त्राव यकृतातुन (लीवर) निघतो जो पित्ताशयात (गालब्लेडर) मध्ये जमा होतो आणि पक्वाशयात येवुन मिळतो. जो अन्नपचनामध्ये मदत

अ) यकृत - (लीवर)

मानवाच्या शरीरातील सर्वात मोठी ग्रंथी आहे, जिचे वजन १.५ किलो आहे. यकृत (ही) प्रतिदिन एक लीटर पर्यंत हिरव्या, पिवळ्या रंगाचा पाचक द्रव 'पित्त' रस निर्माण करते. सामान्य अवस्थेमध्ये ह्याचा अनुभव होवु शकत नाही. परंतु रोगी अवस्थेत जेव्हा ह्यात वाढ होते अशावेळी बोटांद्वारे (हाताच्या सहाय्याने) अनुभवता येते. यकृतात असणाऱ्या हिपेटिक पेशी पित्त (बाइल) ला उत्पन्न करते. (लिवरा) यकृत शरीराचे एक महत्वपुर्ण अंग आहे. यकृत ग्लुकोज ला ग्लाइकोजन च्या रूपात संचित करून ठेवते आणि आवश्यकता भासल्यास (शरीरातील ऊर्जा कमी झाल्यावर) यकृत ह्या ग्लाइकोजनला पुन्हा ग्लुकोज मध्ये परावर्तित करते. ह्याप्रकारे रक्तामधील ग्लुकोज नियंत्रित केले जाते. यकृत आहाराद्वारे येणारे विषारी पदार्थ तसेच अन्य मार्गांनी येणाऱ्या विषारी पदार्थांना आपल्या आत जमा करते. कालांतरने हे विषारी पदार्थ बाईल द्वारे बाहेर टाकले जातात. अथवा बराच काळ यकृतातच पडुन राहतात. यकृत रक्तातील मृत कणांना तोंडून हिमोग्लोबिन ला पीत्त वर्णाचे करून, लोह तत्वाला पुनः कार्यक्षम बनवले जाते. याचमुळे आजारी अवस्थेत जेव्हा रक्त कण जास्त प्रमाणात तुडतात. तेव्हा यकृताचा आकार वाढतो रक्त जमवण्यात सहाय्यता करणाऱ्या पोथोम्बीन नामक प्रोटीन ला विटामिन च्या सहाय्याने निर्माण करते. त्याबरोबरच रक्ता जमा करणाऱ्या हिपेरिन नामक पदार्थाला उत्पन्न करते. गर्भावस्थेत हे यकृतच लाल रक्त कणांना निर्माण करण्याचे कार्य करते.

वरील माहिती शरीरासाठी यकृताची महत्वपूर्णता सिद्ध करते. यकृतामध्ये पुनरूधभवन क्षमता (Greatest power of regeneration) मोठ्या प्रमाणात दिसुन येते. ह्यातील पेशी वेगाने पुन निर्मीत होतात. परंतु जेव्हा मनुष्य

नशीले अथवा उत्तेजक औषधांचे अत्याधिक सेवन केले गेले. तर यकृत शरीरवर होणाऱ्या दुष्प्रभावाला नष्ट करण्याच्या कामात यकृताची क्षमता हळु-हळु नष्ट होवु लागते. नशिल्या (दारू) द्रव्यांच्या दुष्प्रभावापासुन शरीराला वाचवण्यासाठी यक्रताला जास्तीचे श्रम होतात. त्यामुळे यकृताला पेशी हळु-हळु नष्ट होतात. तसेच हळु-हळु त्यांची निर्मीती देखील बंद होते, आणि काम असाध्य होते.

यकृतातुन निघणारे पित्त यकृतात निर्माण होत असते. आणि बाहेर येत रहाते तसेच पित्ताशयात (पित्ताची पिशवी) मध्ये एकत्र होते, येथील पित्त लहान आतड्यात जावून पडते, हे पित्त पचनाच्या दृष्टिने फार महत्वपुर्ण नाही आहे. कारण यात कोणतेच एन्जाइम आढळत नाही. याचे महत्वपूर्ण कार्य आहाराच्या (स्वरूपाला) माध्यमाल परावर्तित करून आहाराचे आम्लातून क्षारात रूपांतरित करणे. ज्यामुळे आतड्यातील एन्जाइम ह्या आहारावर/अन्नावर कार्य करू शकेल. याचे दुसरे काम म्हणजे आतड्याच्या गतीला उत्तेजित करते जेणेकरून अन्न पुढे सरकण्यात मदत होईल.

फैट (चरबी) च्या पचनात हेच पित्त सहायता करते आणि फैट सोबत मिळून पित्त एका साबाणा सारखा धोल तयार करणे ज्यामुळे फॅटचे शोषण लवकर होते. पित्ताचे एक कार्य अनेक भोज्य पदार्थाच्या शोषणामध्ये मदत करणे हे देखील आहे. या द्वारे हेच स्पष्ट होते की, पित्त स्वतः पचन करत नाही परंतु पचनात मदत करते.

ब) अग्नाशयातुन निघणारा स्त्राव

अग्नारशयिकस हा स्त्राव अग्नाशयाद्वारे उत्पन्न होतो.

अग्नाशय किंवा क्लेम ग्रंथी (Pancreas) (स्वादुपिंड)

आमाशयाच्या खाली सत्तर ग्रॅम वजनाची सात इंच लांब आणि दोन इंच जाड ग्रंथी आहे. ही एक दुहेरी ग्रंथी आहे, जी आत आणि बाहेर दोन प्रकारचे स्त्राव तयार करते. पेन्क्रियाज च्या आत बेटाच्या आकारच्या रचना ज्यांना लैंगरं हैस च्या दिपीका (Islets of Langerhan's) म्हटले जाते. ग्लेकेगान तथा इन्सूलिन नामक हार्मोन निर्माण करतात, इन्सुलिन नामक हार्मोन च्या उपस्थिती मध्ये रक्तात उपस्थित शर्करेचे दहन होते. ज्यामुळे ऊर्जा प्राप्त होते.

या इन्सुलिन नाम हार्मोनच्या अभावामुळे रक्तात असलेल्या शर्करेला (Glucose) नष्ट करणे अशक्य होते. तसेच रक्तातील शर्करा हळु-हळु वाढायला सुरूवात होते, हीच अवस्था दीर्घ काळ राहिली तर नष्ट न झालेली शर्करा मोठ्या प्रमाणात क्षार तसेच पाण्या सोबत मूत्राद्वारे शरीराच्या बाहेर काढले जाते. शरीराच्या या अवस्थेला डायबिटीज नेलिप्स् ह्या रोगाने ओळखले जाते. या रोगाच्या आधिक्याने शरीर दुर्बल व निस्तेज होत जाते.

ग्लुकागोन हार्मोन ग्लुकोज आणि नितळपणा सोखण्याच्या क्षमतेला तसेच उपभोगण्याची योग्यता ह्यात संतुलन राखण्यात नियंत्रण करते. ह्याप्रकारे हे दोन हार्मोन्स खतात (Blood Sugar) ला नियंत्रित करते.

पेन्क्रियाज मधुन उत्पन्न होणारा पेन्क्रियेतील स्त्राव सुद्धा छोट्या आतड्यातील याच भागात येतो, ह्यात प्रथिने मेद आणि कार्बोदके यांना पचवणारे एन्जाइम उपस्थित असते. प्रथिने ला पचवणारा मुख्य एन्जाइम ट्रिप्सन यात असतो. हे एन्जाइम प्रथिन्यांवर काम करते आणि प्रथिनांना शीघ्रतेने पचवते.

क) पाचक रस (एन्जाइम)

हे छोट्या आतड्यातून निघते. हा पाचक रस सर्वात तीव्र आणि महत्वपुर्ण स्त्राव आहे. ह्यात असणारे एन्जाइम/ आहाराला पाचनयोग्य बनवतात आणि त्यांचे पूर्णपणे पचन करतात.

ह्या स्त्रावात प्रोटीन पचवणारे दोन एन्जाइम असतात. पहिला एन्टीरोकानेज जो की, ट्रिपसीनोजन ला ट्रिपसीन मध्ये बदलते आणि दुसरा इरीपसीन जो की अर्ध पचित प्रोथिनांचे पूर्ण पचन करून त्याला अंतिम उत्पाद अमीनो आम्लात रूपांतरीत करते. मेदाला पचवणारा एन्जाइम लाइपेज- देखील येथेच असतो आणि मेदाचे पचन देखील होत जाते. ह्यात कार्बोदकांना पचवणारे एन्जाइम (पाचक रस) आढळते. जो कार्बोदकाला ग्लूकोज मध्ये

रूपांतरित करते.

लहान आतड्यातील शोषण

ज्यावेळी अन्न ग्रहण केले जाते, तो शरीर ग्रहण करू शकेल अशा रूपातच ग्रहण केला जातो. कार्बोदके, प्रथिने, मेंद आपल्या (अंमि उत्पाद) रूपात छोट्या आतड्याचा पुढचा भाग जुजेनम मध्ये जातो. ह्यावेळी हे सर्व पदार्थ घुसळण्याच्या स्थितीत असतात ते पेशी भितीकेच्या (Cell Membren) आर-पार येवू-जावू शकते. लहान आतड्याच्या ह्या भागात बोटा प्रमाणे रचना असलेले विलाई अन्नचे अवशोषण करण्याचे कार्य करते.

पचलेले अन्न आतड्याच्या अर्ध पारगम्य पडदयामुळे विकसित होवून कधिर आणि लसिका कोशिकेमध्ये पोहोचते. छोट्या आतड्यामध्ये अवशोषणाच्या क्रियेला दोन ते चार तास लागतात.

६.५ मोठ्या आतड्यातील अवशोषण आणि उत्सर्जन

पोषक तत्व काढून घेतल्यानंतर हे अन्न आता मोठ्या आतड्यामध्ये जाते. मोठ्या आतड्यात अनेक विघटनकारी सहजीवी जीवाणु असतात. जे या अन्नावर किण्वन प्रक्रिया करून त्यांना सडवतात. या क्रियेमुळे कार्बन डाय ऑक्साइड, मिथेन, हाडट्रोजन, नाइट्रोजन आणि अमोनिया आदि गैस तयार होतात. यानंतर हे मल पुढे सरकतो, आणि ह्यातील पाण्याचे शोषण येथेच होते. आता शरीराला अनुपयोगी असणारा मलभाग मलाशयामध्ये (Rectum) एकत्र होतो, जो मोठ्या आतड्याचा अंतिम भाग गुदा (Anus) द्वारे शरीराच्या बाहेर काढला जाते.

क्रमांक भोजन पदार्थ पचन प्रारंभ पचन पूर्ण.

६.६ भूक

जेवण्याच्या प्रति शरीराचे उद्दीपन होते. जेव्हा आमाशय रिकामा होतो. तेव्हा तेथे उपस्थित ज्ञान तंतु (Receptons) ह्याची सुचना मस्तिष्क मध्ये स्थित केंद्र हाइपोशेलमस ला देते. शरीरात ग्लुकोजचा आवश्यकता भासते.

६.७ संक्षिप्त तक्ता

क्रमांक	भोजन पदार्थ	पाचन प्रारंभ	पचन पूर्ण
1	Carbohydrate	Buccal cavity	Ileum
2.	Protein	Stomach	Ileum
3.	Fat	Duodenum	Ileum
	भोजन पदार्थ	अंतिम उत्पाद	शरीरातील क्षेत्र
1	Carbohydrate	Glucoset + Fructose + Glactuse	Through Vesseles
2	Protein	Amino Acids	Through Vesseles
3	Fat	Fatty acids & Glyceruls	Through Lymph vesseles in Ileum
	पाचक रस	नियंत्रण	
	Digestive Juice	Controlled by	
1	Saliva	Nervous controlled	
2	Gastric Juice	Hormonal controlled	
3	Pancreatic Juice	Hormonal controlled	
4	Intestinal Juice	Hormonal controlled	

६.८ सारांश

मनुष्यामध्ये पचन तंत्र तोंडापासुन (मुख) प्रारंभ होवून मोठ्या आतड्याचा अंतिम भाग गुदा पर्यंत जातो. मुखामध्ये दाताने चावण्यापासून भिन्न-भिन्न भौतिक आणि रासायनिक परिवर्तन आहारात होते. आमाशयामध्ये

हाडड्रोक्लोरिक आम्ल मिसळणे यक्रता मध्ये पित्त आणि पेन्कियाज मधुन पैन्कियाटिक ज्युसच्या मिसळण्याने भोजनाचे स्वरूप आणि प्रकृति मध्ये परिवर्तन होत. आणि हे जटिल रूपाच्या स्थानावर सरळ रूपामध्ये परिवर्तित होते.

छोट्या आतड्यात शोषूण घेणाऱ्या कोशिका विलाई आढळतात, ज्या आहाराच्या ह्या सरळ रूपाला पोषक द्रव्याच्या रूपामध्ये ग्रहण करून घेते. येथुन हे पोषक रस रक्ताच्या माध्यमातुन संपुर्ण शरीरात पसरवले जाते. पोषक रस काढून घेतल्यावर आहाराचा मलीन भाग मोठ्या आतड्यात टाकला जातो. मोठ्या आतड्यात त्यातील पाण्याचे शोषण केले जाते. याव्यतिरिक्त मोठ्या आतड्यातील उपस्थित जीवाणु क्रिया करून काही विटामिन्सचे सश्लेषण करते. आणि शेवटी राहीलेला खराब अंश, मल मोठ्या आतड्याचा अंतिम भाग गुदा द्वारे शरीराबाहेर टाकले जाते. जेव्हा हे तंत्र योग्य प्रकारे करते तेव्हा शरीराचे पूर्ण पोषण होते. आणि ऊर्जा प्राप्त होते. जर हे कार्य योग्य प्रकारे कार्य करते नसेल तर शरीरात विकृती किंवा रोग उत्पन्न होतात.

अभ्यास हेतु प्रश्न

चुक / बरोबर

१. विटामिन आणि खनिज क्षारांचे पचन होतच नाही.

२. आमाशयाची सामान्य क्षमता ५ ते १० लीटर ीोजन पदार्थ ग्रहण करण्याची असते.

३. छोटी आतडे पचन आणि शोषणाच्या दृष्टीने खूप महत्वपूर्ण असते.

४. विलाई ची संख्या हजारांने असते.

५. आतड्यात स्थित जिवाणु काही विटामिन्स चे सश्लेषण करते.

योग्य पर्याय निवडा

६. मनुष्याची गणना कोणत्या श्रेणीच्या जीवांमध्ये होते.

क) शाकाहारी, ख) दुग्धाहारी, ग) मांसाहारी, घ) सर्वाहापे

७. शरीरातील सर्वात कठोर पदार्थ आहे.

क) इनेमल, ख) कैल्सियम, ग) आयरन, घ) फस्फोस्स

८. एच.सी.एल. ला उत्पन्न करणाऱ्या कोशिका आहे.

क) आक्सेन्टिक सेल, ग) गोबलेट सेल, ख) ब्लड सैल, घ) नर्व सेल

९. छोट्या आतड्याचे किती भाग असतात.

क)दोन, ख)तीन, ग) पाच, घ) दहा

१०. इन्सुलिन, पैन्कियाज च्या कोणत्या कोणत्या कोशिकांने निघतात.

क) एल्फा सेल्स द्वारे, ख) बीटा सेल्स द्वारे, ग) डेल्टा सेल्स द्वारे, घ) गामा सेल्स द्वारे

६.९ शब्दावली

पुनरूधभवन	पुन्हा ठीक होण्याची अवस्था
दुष्प्रभाव	वाईट (चुकीचा) प्रभाव
लाइलाज	ज्याचा इलाज होणे सीव नाही
उपभोग करणे	प्रयोग करणे
उद्दीपन	एक प्रेरणा किंवा उतेजना
वितारित करणे	विभाजन
संश्लेषण	निर्माण

६.१० अभ्यास प्रश्नाचे उत्तर

१) बरोबर	१) घ
२) चूक	२) क
३) बरोबर	३) क
४) चूक	४) ख
५) बरोबर	५) ख

६.११ संदर्भ ग्रंथसुची

१. प्रो. अनंत प्रकाश गुप्ता, मानव शरीर रचना एव क्रिया विज्ञान, सुमित प्रकाशन आगरा.

२. डॉ. राजेश दिक्षित, शरीर रचना एवं क्रिया विज्ञान, भाषा भवन, मथुरा.

३. डॉ. ओ.पी. सक्सैना, ॲनॉटॉमी ॲण्ड फिजियोलॉजी भाषा भवन, मथुरा.

४. K. Sembulingam, Prema sembulingam Essentials of Medical Physiology, Jaypee Brothers Medical Publishers (P) ltd. New Delhi.

६.१२ निबंधात्मक प्रश्न

१. पचना वरून आपल्याला काय समजते? अन्नाचे पचन कसे होते ते सांगा.

२. मनुष्यातील पचन तंत्राचे सचित्र वर्णन करा.

३. छोट्या आतड्यात होणारे पचन आणि शोषण ह्यांचे वर्णन करा.

४. टिपा लिहा - १) लिवर, २) पेन्क्रियाज, ३) आमाशय, ४) मोठे आतडे.

प्रकरण – ७
उत्सर्जन संस्थाची रचना व कार्य

७.१ प्रस्तावना

